रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ३५४
www.ramprahar.com
गुरुवार, ११ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## भारताचा झिम्बॉब्वेवर विजय; मालिकेत आघाडी



**हरारे** : भारताने तिसऱ्या टी-२० सामन्यात झिम्बॉब्वेचा २५ धावांनी पराभव केला. कर्णधार शुभमन गिलच्या (६६) आणि ऋतुराज गायकवाडच्या ४९ धावांसह भारतीय संघाने १८२ धावा केल्या. प्रत्युत्तरात झिम्बॉब्वेने २० षटकांत ६ गडी गमावून १५९ धावा केल्या. झिम्बॉब्वेकडून डिऑन मायर्सने (नाबाद ६५) अर्धशतक झळकावले. क्लाइव्ह मदांडेने ३७ धावांची खेळी केली. मदांडे आणि मेयर्सने चांगली भागीदारी करीत संघाला विजयापर्यंत नेले पण संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरले. भारताकडून अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरने चमकदार गोलंदाजी केली. त्याने चार षटकांत १५ धावा देऊन तीन विकेट घेतले, तर आवेश खानने २ मोठे विकेट घेतले. या सामन्यातील विजयासह टीम इंडियाने आता या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे.

अंतरंग
पीकअपचा अपघात; चालक गंभीर जखमी/२
अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या १२ बोटींवर कारवाई/३
स्पेन १२ वर्षांनंतर युरो कपच्या अंतिम फेरीत/८

### आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने बैठक

# गरजेपोटी बांधलेल्या घरांवर तोडक कारवाई करू नका

### रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांचे सिडकोला आदेश



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल व उरण मतदारसंघातील विविध समस्यांबाबत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्यासमवेत मंगळवारी (दि.९) मंत्रालयात बैठक घेत चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने गरजेपोटी बांधण्यात आलेल्या घरांवर कारवाई न करण्याची मागणी दोन्ही आमदारांनी केली.

पालकमंत्री उदय सामंत यांनी बोलावलेल्या बैठकीला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, निलेश बाविस्कर, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, इतर पदाधिकारी, माजी नगरसेवक, सिडकोचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी पालकमंत्री उदय सामंत यांनी, शासन धोरण ठरवीत नाही तोपर्यंत गरजेपोटी बांधलेल्या घरांवर कोणतीही तोडक कारवाई न करण्याचे आदेश सिडको प्रशासनाला दिले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी, नगरविकास विभागांतर्गत येणारा नवी मुंबई, ठाणे, पनवेल, उरण हा परिसर मिळून सिडकोची नवी मुंबई निर्माण झाली. १९७०साली सिडकोच्या स्थापनेनंतर असलेल्या गावठाणाच्या सीमारेषा कागदावर कायम केल्या गेल्या. सिडकोची कामे अजूनही होत आहेत मात्र गावठाणाच्या सीमारेषा १९७०सालच्याच ग्राह्य धरल्या जातात आणि यामुळे त्या पलिकडे बांधलेल्या घरांचा प्रश्न आजही प्रलंबित आहे. **(पान २ वर..)**

## ‘पनवेल आगाराचे काम सुरू न केल्यास ठेका रद्द करणार’

पनवेल एसटी आगाराचे काम करणाऱ्या ठेकेदाराला उद्याच पत्र द्यावे. त्याने काम सुरू न केल्यास त्याचा ठेका रद्द करण्याचे आदेश पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले. पनवेल आगाराचे काम अनेक वर्षे रखडल्याने त्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीवरून पालकमंत्र्यांनी एसटी अधिकारी, ठेकेदार आणि महापालिका आयुक्तांची संयुक्त बैठक बोलावली होती.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पनवेल आगाराचे २०१८मध्ये ठेकेदाराने काम पूर्ण करायचे होते. कामाची मुदत पूर्ण होऊनही ठेकेदाराचे काम सुरू केले नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. या बांधकामासाठी आवश्यक परवानगी घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. मग एसटी प्रशासन त्याला का पाठीशी घालत आहे? असा प्रश्न विचारला. बीओटी तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या या आगाराच्या जागेमध्ये सीएनजी गॅसचा पंपही उभारण्यात येणार असल्याची माहिती एसटीच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्यासाठी आवश्यक परवानगी घेतली असल्याचे सांगितले. महापालिका आयुक्तांनी त्याच्या दोन परवानग्या बाकी असून पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली नाही, हे लक्षात आणून दिले. त्यांनी इतर कामाला सुरुवात करण्यास परवानगी देण्याची तयारी दर्शवली. आमदार महेश बालदी यांनी सहा वर्षे यांना परवानगी मिळत नसेल तर अजून १६ वर्षे हे काम रखडेल, अशी शंका व्यक्त केली.

पालकमंत्री उदय सामंत यांनी, आम्ही रत्नागिरी स्टॅन्डचे काम करताना ६०० कोटी रुपये राज्यातील इतर ठिकाणच्या आगाराच्या कामासाठी मंजूर करून घेतले होते. **(पान २ वर..)**

## वरळी हिट अॅण्ड रनप्रकरणी मिहीर शाहाला १६ जुलैपर्यंत कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

वरळीतील हिट अॅण्ड रन प्रकरणात मिहीर शाहाला बुधवारी (दि.१०) शिवडी कोर्टात हजर केले असता १६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मिहीरला सात दिवसांची पोलीस कोठडी मिळावी, अशी मागणी पोलिसांनी न्यायालयात केली होती. या प्रकरणात मिहीरला मदत केलेल्या सर्वांची चौकशी करायची आहे. आरोपीकडे गाडी चालवण्याचा परवाना आहे का? याचा तपास करायचा आहे, असेही पोलिसांनी न्यायालयात सांगितले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायाधीशांनी मिहीरला सात दिवसांची कोठडी म्हणजेच १६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

वरळीच्या कोळीवाड्यात रविवारी बीएमडब्ल्यू गाडीने दुचाकीवर असलेल्या एका जोडप्याला उडवले. या अपघातात दुचाकीवरील पुरुष एका बाजूला जाऊन पडला, तर महिला



गाडीच्या बोनेटवर अडकली. बोनेटवर अडकलेल्या महिलेला कारचालकाने जवळपास एक ते दीड किमी फरफटत नेले, तसेच तिच्या अंगावरून गाडी नेली. या प्रकारानंतर गाडीचा चालक आणि मालक फरार झाला. हे प्रकरण उजेडात येताच पोलिसांनी तत्काळ तपासकार्य सुरू केले. शिवसेनेचे पालघर जिल्ह्याचे प्रमुख राजेश शाह यांचा हा मुलगा मिहीर या प्रकरणात दोषी आढळला, परंतु घटनेनंतर तो फरार होता. अपघात झाल्यानंतर तो आधी प्रेयसीकडे, मग तिथून बोरीवलीला त्याच्या घरी, तिथून ठाणे-शहापूर येथील रिसॉर्टवर कुटुंबीयांबरोबर लपला. त्यानंतर तो मित्रांबरोबर विरारच्या एका रिसॉर्टवर गेला.

या काळात सर्वांचे फोन बंद होते, परंतु त्याच्या मित्राने १५ मिनिटांकरीता मिहीरचा फोन सुरू केला आणि पोलिसांनी त्यांचा माग काढत त्यांना तत्काळ अटक केली. त्याची आई, दोन बहिणीला ताब्यात घेण्यात आले असून मित्र आणि त्याला अटक करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीडित कुटुंबाला १० लाखांची मदत घोषित केली.

### वडील राजेश शाह यांची शिवसेनेतून हकालपट्टी

आरोपी मिहीर शाह याचे वडील राजेश शाह यांची शिवसेनेच्या उपनेतेपदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात चार टक्के वाढ केली आहे. सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४६वरून ५० टक्के करण्यात आला आहे.

राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार, १ जानेवारी २०२४ ते ३० जून २०२४ या कालावधीतील थकबाकीसह जुलै २०२४च्या वेतनाबरोबर वाढीव महागाई भत्ता रोखीने देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

महागाई भत्ता वर्षभरातून दोनदा वाढत असतो १ जानेवारी आणि १ जुलै, मात्र निर्णय उशिरा घेतला जातो. बुधवारी जो शासन आदेश काढण्यात आला आहे, त्यात १ जुलैपासून चार टक्के महागाई भत्त्यात वाढ असे नमूद करण्यात आले आहे. शासकीय, निमशासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी या सगळ्यांना हा महागाई भत्ता मिळणार आहे.

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे आणि जून अशा सहा महिन्यांच्या थकबाकीसह हा महागाई भत्ता कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. महागाई भत्ता आधी केंद्र सरकार जाहीर करते आणि नंतर राज्य सरकार निर्णय घेते. त्यानुसार, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करण्यात आली आहे.

## निवडक

### मराठवाड्यातील काही जिल्ह्यात भूकंपाचे धक्के

**हिंगोली :** मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांमधील काही भागांना बुधवारी (दि.१०) सकाळी ७.१५ वा.च्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. पाच सेकंदांपर्यंतचे धक्के जाणवल्याचे काही स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. या भूकंपची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.५ नोंदविण्यात आली. भूकंपचा केंद्रबिंदू रामेश्वर तांडा गावात असून नांदेड व परभणी जिल्ह्यात भूकंपाचे धक्के जाणवले.

### यूपीत कंटेनरला बसची धडक; १८ प्रवाशांचा मृत्यू

**उत्तर प्रदेश** : बेहता मुजावर परिसरात बुधवारी (दि.१०)पहाटे झालेल्या भीषण अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. एक स्लीपर बस दुधाच्या कंटेनरला मागून धडकल्यामुळे हा अपघात झाला. शिवगडहून दिल्लीच्या दिशेने ही बस जात होती. लखनौ-आगरा महामार्गावर बेहता मुजावर परिसरात समोर उभ्या दुधाच्या कंटेनरला बस मागून जोरात धडकल्याने अपघात झाला.

## मुंबई-गोवा महामार्गावर आजपासून विशेष ब्लॉक

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर ११ ते १३ जुलै या तीन दिवसांत सकाळ आणि दुपारच्या सत्रात ब्लॉक घेतले जाणार आहेत. कोलाडजवळील पूई येथे नवीन पुलाचे गर्डर टाकण्याचे काम करण्यासाठी हे ब्लॉक घेतला जाणार आहे. वाहतूक विभागाच्या अप्पर पोलीस महासंचालकांनी याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

सकाळी ६ ते ८ आणि दुपारी २ ते ४ वा. दरम्यान दोन टप्प्यांत हे ब्लॉक घेतले जाणार आहे. या काळात महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक बंद ठेवली जाणार आहे. चौपदरीकरण कामाचा एक भाग म्हणून कोलाडजवळील पुई येथील नवीन पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. या पूलाचे गर्डर टाकण्याचे काम ११ ते १३ जुलैदरम्यान केले जाणार आहे. यासाठी सहा मोठे गर्डर आणण्यात आणण्यात आले आहेत. गर्डर बसविण्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीही पुलाजवळ दाखल झाल्या आहेत. हे काम करताना वाहतूक बंद ठेवणे गरजेचे असल्याने ठेकेदार तथा महामार्ग विभागामार्फत वाहतूक महासंचालकांकडे मागणी करण्यात आली होती. त्यानुसार वाहतूक विभाग अप्पर पोलीस माहसंचालक कार्यालयातील पोलीस अधीक्षक अरविंद साळवे याबाबतची वाहतूक प्रतिबंधात्मक अधिसूचना मंगळवारी उशिरा जारी केली आहे.

### हे आहेत पर्यायी मार्ग

वाकण पाली येथून वाहतूक भिसेखिंड, रोहा कोलाडमार्गे पुन्हा मुंबई-गोवा महामार्गावर जाता येईल.

वाकण येथून महामार्गावरील वाहतूक पाली, रवाळजे, निजामपूर-माणगाव येथे मुंबई -गोवा महामार्गाला पुढे जाता येईल.

याशिवाय खोपोली, पाली, रवाळजे, निजामपूर, माणगावमार्गे मुंबई -गोवा महामार्गाला पुढे जाता येईल.

## कामोठ्यात ‘रयत’चे विभागीय कार्यालय

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अपेक्षेपेक्षाही चांगली इमारत या ठिकाणी उभी राहिली असल्याचे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी (दि.१०) रयत शिक्षण संस्थेच्या विभागीय कार्यालयाच्या उद्‌घाटनावेळी केले.

कामोठे सेक्टर ११मध्ये रयत शिक्षण संस्थेचे व्यावसायिक कॉलेज सुरू होणार आहे. या प्रस्तावित कॉलेजच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर असून या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय कार्यालय बांधण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्‌घाटन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी झाले.



या सोहळा जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

या वेळी ‘रयत’च्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुभदा नायक, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूलच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी, विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर, सहाय्यक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, आर्किटेक्ट नरेंद्र वळूंज, विक्रम धुमाळ, शमा ठाकूर, ठेकेदार यशवंत डोंगरे, बाबुल दत्ता, हनुमंत पवार, विघ्नेश टोळे, यांच्यासह इतर शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## दारू पिऊन गाडी चालवल्यास वाहन परवाना होणार रद्द

**पुणे :** दारू पिऊन गाडी चालवत झालेल्या अपघाताच्या घटना गेल्या काही दिवसांत घडल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर मागील सात महिन्यांत एक हजार ६८४ दुचाकी आणि चारचाकी चालकांवर पुणे पोलिसांना कारवाई दरम्यान केली आहे. त्यामुळे आता या सर्वांचे वाहन परवाने तीन महिन्यांसाठी रद्द होणार आहेत.

वाहतूक पोलीस उपायुक्त रोहिदास पवार म्हणाले, पुणे पोलीस विभागामार्फत दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या चालकांवर सातत्याने कारवाई सुरू आहे. यासंबंधी चालकावर कठोर कारवाई करावी, याबाबतचा अहवाल आरटीओ कार्यालयाला पाठविण्यात आला आहे. त्यामुळे या सर्वांचा तीन महिन्यांसाठी वाहतूक परवाना रद्द होणार आहे.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे शाळांमध्ये वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उज्ज्वल भविष्यासाठी आत्तापासूनच आपण चांगले शिक्षण घेतले पाहिजे, असा सल्ला भाजपचे तालुकाध्यक्ष तथा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी बुधवारी (दि.१०) वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले, तसेच यंदाच्या वर्षी मंडळाच्या वतीने एक लाख वह्यांचे वाटप करण्यात येत असल्याची माहिती दिली.

श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना कोणीही समस्या उद्‌भवू नये, यसाठी अनेक शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. या अंतर्गत दरवर्षी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. तालुक्यातील नावडे आणि पडघे येथील रायगड जिल्हा



परिषदेच्या शाळांमध्ये वह्यावाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून त्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी भाजप युवा मोर्चाचे रायगड जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, पंढरीनाथ खानावकर, कमलाकर खानावकर, प्रभाकर खानावकर, शुभम खानावकर, दीपक खानावकर, राम म्हात्रे, प्रताप चव्हाण, प्रीतम म्हात्रे, विशाल खानावकर, विनोद खानावकर, विजय खानावकर, भूपेश खानावकर, आनंद सोनवणे, हेमंत कांबळे, प्रथमेश खानावकर, सुरज खानावकर, रुपेश खानावकर, युवा मोर्चाचे जिल्हा सचिव शुभ पाटील, माजी सरपंच कृष्णाशेठ पाटील, दिलीप भोईर, शंकूनाथ भोईर, अॅड. पवन भोईर, नामदेव भोईर, आशिष कडू, गुरुनाथ भोईर, के. टी. भोईर, विष्णू पाटील, अलंकार पाटील, कुणाल पाटील यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## नाशिकमध्ये अपंगांसाठी राज्यातील पहिले नाट्यगृह

**नाशिक : प्रतिनिधी**

अपंग विद्यार्थ्यांना अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. या समस्या लक्षात घेत अपंग विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) संस्थेच्या वतीने राज्यातील अपंगांसाठीचे पहिले नाट्यगृह नाशिक येथे आकारास येत असून त्यासाठी फ्रान्समधील फॉर व्हिवो फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे.

बहुविकलांग विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घ्यायचा असेल तर आवश्यक प्रकाशयोजना, रंगमंचावर पोहचण्यासाठी रस्ता, व्हीलचेअर यांसह अन्य काही गरजा पुरविणे भाग असते. त्यामुळेच हे नाट्यगृह बांधण्यात येणार आहे. सातपूर भागात संस्थेच्या कार्यालयाच्या आवारात २५० आसन क्षमतेचे नाट्यगृह आकारास येत आहे. नाट्यगृहासाठी फ्रान्स येथील फॉर व्हिवो फाउंडेशनने निधी उपलब्ध केला आहे. साधारणत: दीड कोटी खर्च अपेक्षित असून पहिल्या टप्प्यासाठी ६० लाखांचा निधी उपलब्ध झाल्याने काम सुरू झाले आहे.



# पीकअपचा अपघात; चालक गंभीर जखमी

**खोपोली :** भरधाव वेगाने खोपोलीच्या दिशेने जाणाऱ्या पीकअपवरील चालकचे नियंत्रण सुटल्याने पिकअप दुभाजकावर चढून टेम्पोला धडकून झालेल्या अपघातात चालक हर्षद हनुमंत शिंदे (वय २८, रा.सांगली) गंभीर जखमी झाल्याची घटना खालापूर जवळ घडली आहे.

हर्षद त्याच्या ताब्यातील पिकअप घेऊन पनवेलहून खोपोलीच्या दिशेने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरून निघाला होता. खालापूर हद्दीत रिंकी हॉटेलसमोर हर्षदचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने पीकअप दुभाजकावर चढली. त्याचदरम्यान खोपोलीच्या दिशेने जाणाऱ्या टेम्पोला पिकअपची जोरदार धडक बसली. अपघातात पिकअपच्या पुढील भागाचा चक्काचूर होवून चालक हर्षद अडकून बसला होता.

अपघाताची माहिती मिळताच खालापूर पोलीस तातडीने घटनास्थळी पोहचले. देवदूत पथक आणि अपघातग्रस्त मदत पथकाच्या साह्याने केबिनमध्ये अडकून बसलेल्या चालकाला बाहेर काढण्यात आले. गंभीर जखमी हर्षदला एमजीएम रुग्णालय कामोठे येथे उपचार करता पाठवण्यात आले असून त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली आहे.


## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा क्र.: पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२९९/३००/२०२४ दिनांक : १०/०७/२०२४

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | ई- निविदा किंमत रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हददीतील खारघर-कोपरा येथील प्लॉट-२५ व २५बी, सेक्टर-१५ मधील गार्डन विकसित करणे. (व्दितीय वेळ) | PMC/PWD/CE./ 03/2024-2025 | २,९८,६८,८४१/- (GST वगळून) | २,३६०/- | १८ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ११/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त-I,
पनवेल महानगरपालिका, पनवेल



## सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजने अंतर्गत वाटप करण्यांत आलेल्या **मौजे -ओवळे** निवाडा **युनिट क्रमांक १४७** मधील स.नं. १४५/३, १४५/७, १४६/२, १४६/५,१४७/२सी, १६३/५, ३८/७+१, ७ क्षेत्र-२६०० चौ.मी. या संपादित जमिनचे खातेदार **श्री. नामदेव द्वारकानाथ गायकवाड** यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड येथील **भूखंड क्र. २, सेक्टर-७, क्षेत्र-२६०० चौ.मी.** चे **संचिका क्र. १४७** ओवळे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

आता खातेदार **श्री. नामदेव द्वारकानाथ गायकवाड** यांनी त्यांचा वाटपित झालेला पुष्पक नोड येथील **भूखंड क्र. २, सेक्टर-७, क्षेत्र-२६०० चौ.मी.** या भूखंडाबाबत या हक्कसोड सादर केले आहे.

दुय्यम निबंधक **पनवेल-३ नोंदणी क्रमांक- पवल३-७५५०-२०२४, पावती क्र. ८८८८, दिनांक २४.०४.२०२४** यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपित झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत. :-

उक्त दुय्यम निबंधक पनवेल येथील नोंदणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमूद केल्यानुसार खालील त्यांना वाटप झालेल्या भूखंडाचे हक्क या खातेदारांच्या लाभात सोडले आहेत ते खातेदार पुढील प्रमाणे:-

| अ. क्र. | वारस दाखल्यानुसार हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (ii) |
|---|---|---|
| १. | महादुबाई द्वारकानाथ गायकवाड | नामदेव द्वारकानाथ गायकवाड |
| २. | बानुबाई चांगदेव म्हात्रे | आत्माराम द्वारकानाथ गायकवाड |
| ३. | लीला हरिभाऊ नाईक | विष्णू द्वारकानाथ गायकवाड |
| ४. | | चंद्रकांत द्वारकानाथ गायकवाड |

उपरोक्त हक्कसोडपत्रानुसार केवळ टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत अशा व्यक्तींच्या नांवे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळमजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यांत येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०७८/२०२४-२५



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी १. श्रीमती. इंदुबाई आत्माराम पाटील, २. श्री. शरद आत्माराम पाटील, ३. श्री. निलेश आत्माराम पाटील ४. श्री. सुरेश आत्माराम पाटील, ५. श्रीमती. पुष्पा अंकुश सुरते सर्व राहणार ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड यांचे नावे मौजे पुष्पक नगर सेक्टर ३, ता. पनवेल, जि. रायगड येथिल प्लॉट नं. १९५, ७० चौ.मी ही मिळकत सिडको महामंडळ कडून लीज वर मिळालेली मिळकत असून सदरचा भुखंडा मधील लिजचे अधिकार त्यांचे कडून आमचे आशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत खरेदीबाबत आमचे अशिलांची विद्यमान मालकांचेसोबत व्यवहार ठरविला असून सदर मिळकत खरेदी करण्याचे आमचे अशिलांनी ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहीत असून सदर मिळकत कोणासही दान, गहाण, फरोक्त, बक्षिस, लिजवर, खरेदीखताने कोणासही दिलेली नसल्याबाबत विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना कळविलेले आहे. तरीसुध्दा सदर मिळकतींबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास वा कुणाचीही सदर मिळकतींचे विक्रीव्यवहारास हरकत, अडकाठी असल्यास ही नोटीस दैनिकात प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे अशिलांस खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक: १०/०७/२०२४**
**सदर नोटीस माझे जबाबदारीवर देत आहे.**

सही/-
**ॲड. सुजित जनार्दन गावंड**
फ्लॅट नं. ३०४, प्लॉट नं. ७४, सहयाद्री
निवास सि.एच.एस.एल, सेक्टर ०५,
सानपाडा फोनः ८५९१९७४७३२



## PUBLIC NOTICE

**(0.5.R.20)** Applicant Adv **- K.B.PATEL**

**IN THE COURT OF MOTOR ACCIDENT CLAIM TRIBUNAL JUDGE SHRI.N,A.ANJARIA SAHEB (P.D.J.COURT) OF KHEDA AT NADIAD. (GUJARAT STATE)**

M.A.C.P. NO -1131/2021
EXH - 26

APPLICANT :- HEIR OF DECEASE DINESHBHAI HURPAL MAHIDA(Deceased)
1.1) SHARDA DINESH MAHIDA
RESI-VADLIPADA, TA-KUSALGADH,
DIST-BANSVADA, RAJASTHA

VS

**OPPONENTS**

1) RAMESH AJINATH CHAVAN
Address - RESI-C/0, HOUSE N0. 412, OFFICE NO. 208, 2ND FLOOR, SHREE COMPLEX, URAN, RAIGARH, -400702 (MAHARASHTRA)
2) JAYPAL HARPHOOL KASWA
RESI- C/O, HOUSE NO, 412, OFFICE NO. 208, 2ND FLOOR, SHREE COMPLEX, URAN, RAIGARH, PIN NO.400702 (MAHARASHTRA)

**Fixed On :- 20.07.2024**

Whereas, Applicant has instituted the above filed an application agaist you U/S 166 of Motor Vehical Act due to an Acciden occurred by vehicale PB.11.C.J.4345 to recover compensation of Rs.30,00,000/- with interest of 18 % from you, You are hereby orderderd to remain present on this Court In person or by.a. pleader on the day of 20 July, 2024 at 10.45 a.m. to answer the same with all the documents on which you rely upon, failing which the application will be disposed of ex- parte.

Given under my hand and the seal ofthe o Tribunal on 2nd July 2024

Prepared By
sd/-
(J.K.Chauhan)
Assistant

Campared By
sd/-
(C.N.Bhankhariya)
Suprintendent

By Order
sd/-
(H.CRajwani)
Deputy Registrar,
M.A.C.T. Branch,
District Court, Nadiad.


पान १ वरून

## गरजेपोटी बांधलेल्या घरांवर कारवाई करू नका

या जमिनीवरील घरे नियमित करावीत यासाठी लोकनेते दि. बा. पाटील साहेबांनीसुद्धा संघर्ष केला आहे. या ठिकाणी वारंवार झालेल्या संघर्षामुळे कधी २०० ते कधी २५० मीटरची मर्यादा घातली गेली आहे, पण २५० मीटरची मर्यादासुद्धा अव्यवहार्य आहे. मधल्या काळात क्लस्टरचा पर्याय आला, पण क्लस्टर असावे की गावठाण असावे या वादात कोणताही निर्णय झाला नाही. पनवेल महानगरपालिका झालेली आहे. अन्य ग्रामपंचायतीही आहेत, पण गावठाणभोवतालच्या बांधकामावर नागरिक आपली घरे पुनर्बांधणी करायला जातात, मात्र पुनर्बांधणी करायला सिडको त्यांना परवानगी देत नाही आणि त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होते.

या वेळी पालकमंत्री उदय सामंत यांनी, शासन धोरण ठरवीत नाही तोपर्यंत गरजेपोटी बांधलेल्या घरांवर कोणतीही तोडक कारवाई न करण्याचे आदेश सिडको प्रशासनाला दिले.

## 'पनवेल आगाराचे काम लवकर सुरू न केल्यास ठेका रद्द करणार'

त्यामधून पनवेलचे काम का केले नाही? असा प्रश्न त्यांनी एसटीच्या अधिकाऱ्यांना विचारला. पालकमंत्री उदय सामंत यांनी ठेकेदाराला पत्र देऊन त्याचे कामाचे नियोजन काय आहे हे विचारावे. या आगाराच्या हद्दीत जे जुने व्यावसायिक आहेत त्यांचीही सोय त्याने करणे गरजेचे आहे. ठेकेदाराने पत्र दिल्यानंतर काम सुरू न केल्यास त्याच्यावर पुढील कारवाई करावी, असे आदेश दिले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी, एक महिन्याने पुन्हा बैठक घेण्याची मागणी केली.


## ग्रामपंचायत वाकडी
कार्यालय : वाकडी, ता. पनवेल, जि. रायगड. पिन - ४१०२०६

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत वाकडी, ता. पनवेल यांनी खालीलप्रमाणे १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ साठीचे मंजूर साहित्य खरेदी / उपक्रम शासन नियमातील अटी व शर्तीनुसार जाहीर निविदा सीलबंद लिफाफ्यामध्ये दि.१५/०७/२०२४ रोजी सकाळी १०.३० पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय वाकडी यांचे कडे मागविनेत येत आहेत. सदर कामाच्या कोऱ्या निविदा मिळण्याची तारीख दि.०५/०७/२०२४ ते दि.१५/०७/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात प्रती १००/- रुपये प्रमाणे उपलब्ध होतील.

| अ.क्र. | साहित्याचे / उपक्रम नाव | तरतूद रक्कम | कालावधी | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीय गरजू लाभार्थीना वैयक्तिक संगणक प्रशिक्षण देणे व मुलींनं व्यवसाय प्रशिक्षण देणे. | ५०००० | ६ दिवस | १५ वा वित्त आयोग २०-२१ |
| २ | ग्रामपंचायत हद्दीतील आपत्ति व्यवस्थापण व नियंत्रण उपाय योजना अंतर्गत प्रकल्प तयार करणे.(cctvबसविणे.) | ६७६१५ | २ महिने | १५ वा वित्त आयोग २०-२१ |
| ३ | ग्रामपंचायत हद्दीतील किशोर वयीन मुलीना प्रायोगिक तत्वावर नॅपकिन वाटप कण्यासाठी खरेदी करणे. | २०००० | २ महिने | १५ वा वित्त आयोग २१-२२ |
| ४ | जेष्ठ नागरिक महिला व आरोग्य तपासणी करणे व उपाययोजना संबंधी साहित्य वाटप करणे व शासन करीत नसलेले लसीकरण करणे. | २०००० | १ महिना | १५ वा वित्त आयोग २२-२३ |
| ५ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडीतील कमी वजनाच्या मुलांना पोषण आहार व भांडी, साहित्य खरेदी करणे. | ५४९४७ | २ महिने | १५ वा वित्त आयोग २२-२३ |
| ६ | ग्रामपंचायत कार्यालय येथे नवीन कॉम्पुटर खरेदी करणे. | ५०००० | १ महिना | १५ वा वित्त आयोग २२-२३ |
| ७ | कृषी बी-बियाणे खते खरेदी. | ९२१६७ | ३ महिने | १५ वा वित्त आयोग २२-२३ |
| ८ | विविध प्रशिक्षण घेणे. | २०००० | २ महिने | १५ वा वित्त आयोग २२-२३ |
| ९ | ग्रामपंचायत कडील नळ पाणीपुरवठा योजनेकडील विद्युत मोटर पंप खरेदी करणे. | ५०००० | ३ महिने | १५ वा वित्त आयोग २३-२४ |
| १० | मौजे वाकडी आदिवासीवाडी येथे सौरऊर्जा / विज उभारणी करणे. | ४५९६१ | ३ महिने | १५ वा वित्त आयोग २३-२४ |
| ११ | मौजे वाकडी येथे विज / सोलार ऊर्जा प्रणाली उभारणी करणे. | ६०४९७ | २ महिने | १५ वा वित्त आयोग २३-२४ |
| १२ | ग्रामपंचायत वाकडी हद्दीत घनकचरा व्यवस्थापन तसेच सांडपाणी व्यवस्थापन करणे. | २८०४४० | २ महिने | १५ वा वित्त आयोग २४-२५ |
| १३ | रा. जि. प. शाळा वाकडी येथे मागणीप्रमाणे निधी खर्च करणे. | ८४१३२ | १ महिना | १५ वा वित्त आयोग २४-२५ |
| १४ | ग्रामपंचायत वाकडी हद्दीतील अंगणवाडी येथे मागणीप्रमाणे निधी खर्च करणे. | ३७३९२ | १ महिना | १५ वा वित्त आयोग २४-२५ |
| १५ | शाळेसाठी सौर पॅनल खरेदी करणे. | ५५००० | १ महिना | १५ वा वित्त आयोग २०-२१ |
| १६ | ग्रामपंचायत वाकडी हद्दीतील आपत्ती व्यवस्थापन नियोजन करणे. (CCTV राबविणे.) | १४७०१५ | २ महिने | १५ वा वित्त आयोग २४-२५ |
| १७ | ग्रामपंचायत वाकडी आदिवासीवाडी यांना वैयक्तिक स्टील टाकी पुरविणे. | १५०००० | २ महिने | ग्रामनिधी १५% २४-२५ |

वरील प्रमाणे निविदा ग्रामपंचायत अटी व शर्ती कार्यालयात पाहून मान्य असल्यास बंद लिफाफ्यामध्ये निविदा विहित मुदतीत सादर कराव्यात.
दिनांक : १०/०७/२०२४

सही/-
**सचिन बाळाराम पाटील**
**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत वाकडी
ता.पनवेल,जि.रायगड

सही/-
**कुंदा बाळू पवार**
**सरपंच**
ग्रामपंचायत वाकडी
ता.पनवेल,जि.रायगड



## ग्रामपंचायत वाकडी
कार्यालय : वाकडी, ता. पनवेल, जि. रायगड. पिन - ४१०२०६

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत वाकडी, ता. पनवेल यांनी खालीलप्रमाणे १५ वा वित्त आयोग व ग्रमनिधी सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ साठीचे मंजूर विकासकांच्या शासन नियमातील अटी व शर्तीनुसार जाहिर निविदा सीलबंद लिफाक्यामध्ये दि. १५/०७/२०२४ रोजी सकाळी १०.३० पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय वाकडी यांचे कडे मागिविनेत येत आहेत. सदर कामाच्या कोऱ्या निविदा मिळण्याची तारीख दि. ०५/०७/२०२४ ते दि. १५/०७/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात प्रती १००/- रुपये प्रमाणे उपलब्ध होतील.

| अ. क्र. | विकासमाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कालावधी | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाकडी गावातील आदिवासी वाडीतील गल्लीमध्ये पेव्हरब्लॉक बसविणे | २४९७६४ | २४९७ | ३ महिने | १५ वित्त २०-२१ |
| २ | ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील खड्डे बुजविणे. | ७५००० | ७५० | १ महिना | १५ वित्त २०-२१ |
| ३ | शाळेसाठी सौर पॅनल खरेदी करणे | ५५००० | ५५० | २ महिने | १५ वित्त २०-२१ |
| ४ | शाळेचे शौचालय वॉशबेसिन दुरुस्ती करणे. | ४४७६१ | ४४७ | २ महिने | १५ वित्त २०-२१ |
| ५ | अंगणवाडी क्रमांक-१ व २ पाणी आडवा पाणी जिरवा राबविणे (water harvesting) | ४६९०५ | ४६९ | २ महिने | १५ वित्त २०-२१ |
| ६ | आदिवासीवाडी येथील बोरवेल पुर्नभरण व दुरुस्ती व आदिवासीवाडी क्र.१ येथे नविन बोरवेल मारणे | ६२००० | ६२० | २ महिने | १५ वित्त २१-२२ |
| ७ | वाकडी गावातील पिण्याच्या पण्याच्या टाकीजवळ शुद्ध पिण्याच्या पाण्याकरीता वॉटर फिल्टर, आरो प्लान्ट बसविणे व संरक्षण शेड तयार करणे | १७२७३४ | १७२७ | २ महिने | १५ वित्त २१-२२ |
| ८ | वाकडी ग्रामपंचायत हद्दीतील लक्ष्मण मनोरे ते राजाराम चोरघे यांच्या घरापर्यंत गटार करणे | १००००० | १००० | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| ९ | प्राथमिक शाळेसाठी २ नवीन शौचालय बांधणे | ९९६८० | ९९६ | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| १० | धोंडू पाटील यांचे घरापासून बाळू म्हात्रे यांचे घरपर्यंत बंदिस्त गटार लाईन करणे. | १३०००० | १३०० | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| ११ | ग्रामपंचायत कार्यालयाजवळ सिंटेक्स टाकी बसविणे व बोअरवेल चे पाणी टाकीत सोडणे | १०५००० | १०५० | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| १२ | आदिवासी स्मशानभूमी जवळ नविन बोअरवेल बांधणे | ४५००० | ४५० | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| १३ | संपूर्ण गावातील स्टॅण्ड पोस्ट दूरस्त करून नवीन नळ बसविणे, पाण्याच्या टाक्या धुवणे | ७९६८० | ७९६ | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| १४ | गावातील बोअरवेल पुर्नभरण करणे आदिवासीवाडी येथील बोअरवेल पुर्नभरण करणे. प्राथमिक शाळेजवळील बोअरवेल पुर्नभरण करणे | १००००० | १००० | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| १५ | आदिवासीवाडी येथे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या नाल्यावर मोरी बांधकाम करणे | १४४९८२ | १४४९ | २ महिने | १५ वित्त २२-२३ |
| १६ | वाकडी अंतर्गत बंदिस्त गटार बांधकाम करणे. | २००००० | २००० | २ महिने | १५ वित्त २३-२४ |
| १७ | जलशुद्धी करण केंद्राकडील विद्युत उपकरणे देखभाल दुरुस्ती करणे | ५०००० | ५०० | २ महिने | १५ वित्त २३-२४ |
| १८ | ग्रामपंचायत वाकडी हद्दीत घनकचरा व्यवस्थापन तसेच सांडपाणी व्यवस्थापन करणे | २८०४४० | २८०४ | २ महिने | १५ वित्त २४-२५ |
| १९ | वाकडी नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्ती करणे व साहित्य खरेदी करणे | २३०८६० | २३०८ | २ महिने | १५ वित्त २४-२५ |
| २० | ग्रामपंचायत वाकडी हद्दीतील आदिवासीवाडी समाजमंदिर दुरुस्ती करणे | ६७९८९ | ६७९ | २ महिने | १५ वित्त २४-२५ |
| २१ | वाकडी येथे वैयक्तिक नळ जोडणी देणे. | २५०००० | २५०० | २ महिने | प.स.सेस |
| २२ | शांतीवन येथे पंप हाऊस बांधणे | १७५००० | १७५० | ३ महिने | प.स.सेस |

वरील प्रमाणे निविदा ग्रामपंचायत अटी व शर्ती कार्यालयात पाहून मान्य असल्यास बंद लिफाफ्यामध्ये निविदा विहित मुदतीत सादर कराव्यात.
दिनांक : १०/०७/२०२४

सही/-
**सचिन बाळाराम पाटील**
**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत वाकडी
ता.पनवेल,जि.रायगड

सही/-
**कुंदा बाळू पवार**
**सरपंच**
ग्रामपंचायत वाकडी
ता.पनवेल,जि.रायगड

## निवडक

### कामोठे येथील तरुणी बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सविता सुशिल सोंडे (२३ रा.कामोठे) असे तीचे नाव असून, उंची पाच फुट दोन इंच, चेहरा गोल, रंग गोरा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे लांब, नाकामध्ये चमकी, कानामध्ये प्लास्टीक खोटे टॉप असून अंगात सफेद टी-शर्ट व निळी जिन्स पॅन्ट व पायात शुज घातले आहेत. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे (०२२-२७४३१४१३) किंवा पोलीस हवालदार एच.एस.शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### संगनमत करून एकाला मारहाण

**पनवेल :** संगनमत करून एका व्यक्तीस मारहाण केल्याची घटना वावंजे-कुत्तरपाडा रोडवर घडली आहे. इरफान शेख (वय २४) याला तिघांनी आपसात संगनमत करून मोटरसायकलवरून खेचून लाकडी बांबुने मारहाण करून त्याला जखमी केले आहे. तसेच मारण्याची धमकी दिल्याने याबाबतची तक्रार त्यांनी तालुका पोलीस ठाण्यात केली आहे.

### पार्क केलेली स्कूटी चोरीला

**पनवेल :** रेल्वे स्टेशनच्या पार्किंगच्या जवळच्या जागेत उभी असलेली ॲक्टीव्हा स्कूटीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे. जया पिसे यांनी त्यांची जवळपास १५ हजार रुपये किंमतीची निळ्या रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा स्कूटी (एमएच-०५-सीई-३२०१) ही रेल्वे स्टेशनच्या पार्किंगच्या जवळ मोकळ्या जागेत उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कळंबोली रोडपाली येथे घरफोडी

**पनवेल :** बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केल्याची घटना कळंबोली रोडपाली येथे घडली आहे. विशाल कदम यांचे कळंबोलीतील रोडपाली येथे सेक्टर १० ई विनायक आनंद सोसायटी येथे घर असून त्यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी संधी साधून घर फोडून घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मिळून जवळपास पाच लाख १७ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ग्राइंडवेल नॉर्टनतर्फे पुरस्कार वितरण



**उरण :** ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेडच्या वतीने दिर्घ सेवा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच नवी मुंबई येथील फोर पोइंट हॉटेल येथे मोठ्या उत्साहात झाला. ग्राइंडवेल नॉर्टन कंपनीचे एक्झीकेटीव्ह डायरेक्टर वेणू शानबाग यांच्या हस्ते ज्यांनी कंपनीमध्ये १५ वर्षे, २५ वर्षे व ३५ वर्षे सर्विस केली आहे अशांना सन्मान चिन्ह, सन्मानपत्र देवून सन्मानित करून गौरविण्यात आले. या वेळी ग्राइंडवेल नॉर्टनचे सीएफओ इंडिया रिजन हरीसिंगु दासू, ॲब्रेसीव व्हाईस प्रेसिडेंट अमित कौंल, एच आर हेड अन्वेशा सेन, अडमीनचे सिनिअर मॅनेजर इंद्रभान सिंग, मॅनेजर अनंता कामथ, प्लांट हेड राहुल देशक, युनियन लिडर धनंजय म्हात्रे, गणेश पाटील, लक्ष्मन रेवणे, संदीप राऊत व स्टाफ आदी उपस्थित होते.

### ‘माझी बहिण’च्या शिबिराला मुदतवाढ

**पनवेल :** महापालिकेच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आली आहे. या अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात पाच ठिकाणी सुरू असलेल्या विशेष शिबिराला शुक्रवार (दि. १२)पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पनवेल शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरावेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी, मुदतवाढ करण्यात आलेल्या शिबिराचा लाभ प्रभाग क्रमांक १९मधील महिलांनी घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# पावसाळ्यातील साथरोग टाळण्यासाठी काळजी घ्या

## पनवेल मनपा आयुक्तांचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केलेआहे. या पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्याच्या दृष्टीने घनकचरा-आरोग्य व वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत बांधकाम स्थळे, भंगार दुकानदार, नारळविक्रेते, नर्सरी व्यवसायिक, सोसायट्यांना महापालिकेच्या वतीने नोटीसांचे वाटप करण्यात येत आहेत.



पावसाळ्यामध्ये साचलेल्या पाण्यांमध्ये डासांची उत्पत्ती होते, त्यामुळे डेंगू, मलेरिया व इतर किटकजन्य रोगाची लागण होऊ शकते. त्यामुळे बांधकाम स्थळाच्या मालकांनी त्या परिसरांमध्ये इतरत्र पाणी साठू देऊ नये याची काळजी घ्यावी. तसेच सेंट्रिंग प्लेटमध्ये आठवड्यातून एकदा ऑईल टाकावे. याठिकाणी डास उत्पत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावे व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

याचबरोबर नारळ विक्रेत्यांनी त्यांच्याजवळ असलेल्या रिकाम्या शहाळांमध्ये पाणी साठणार नाही, हातगाडी शेजारी रिकामे शहाळे साठणार नाही याची दक्षता घेण्याविषयीच्या सूचना पालिकेच्या वतीने नारळ विक्रेत्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच नर्सरी व्यवसायिकांनी आपल्या नर्सरीबाहेर कुंड्या, मडकी, तत्सम वस्तुंमध्ये पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी, यापध्दतीने टायर विक्रेत्यांनी जुने टायर, भंगार विक्रेत्यांनीदेखील दुकानाबाहेर रिकामे डब्बे, ड्रम, प्लास्टिकच्या वस्तू काचेच्या बाटल्या अशा वस्तु ज्यामध्ये पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी, पाणी साठून डास उत्पत्ती होणाऱ्या वस्तूंची विल्हेवाट लावावी, अशा सूचना पालिकेने नोटीसाच्या माध्यमातून दिल्या आहेत.

महापालिका हद्दीतील सर्व सोसायट्यांना त्यांच्या परिसरांमध्ये, टेरेसवर किंवा घरातील विविध वस्तुंमध्ये पाणी साठत असल्यास त्याचा योग्यप्रकारे निचरा होईल व त्याठिकाणी डास उत्पत्ती होणार नाही याची खबरदारी घेण्याविषयीच्या नोटीसा देण्याचे काम सुरू आहे. तसेच नागरिकांनी घरात पाणी साठविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीस डास प्रतिबंधकजाळ्या लावाव्यात. पाण्याचे ड्रम आठवड्यातून एकदा कोरडे करावे जेणेकरून अशा साहित्यमध्ये डास उत्पत्ती होणार नाही व मलेरिया, डेंगू रोगास आळा घालता येईल याची काळजी घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यात साठलेल्या पाण्यात डेंगू, मलेरिया व इतर किटकजन्य रोगाची लागण होऊ शकते. त्यामुळे नोटिसा दिलेल्या बांधकाम स्थळे, भंगार दुकानदार, नारळविक्रेते, नर्सरी व्यवसायिक, सोसायट्यांनी महापालिकेने सांगितलेल्या सूचनांचे पालन केले नाही, संबधित ठिकाणी डेंगू, मलेरियाचे डास, त्यांची अंडी आढळल्यास त्यांच्यावरती महापालिकेच्या माध्यमातून दंडात्मक कारवाई होईल, असे सक्त निर्देश आयुक्तांनी दिलेले आहेत.

आजपर्यंत महापालिका क्षेत्रातील सुमारे ३९८ बांधकाम स्थळे व तीन हजार २६४ सोसायट्यांना साथरोग-किटकजन्य आजार टाळण्याकरिता नोटिसांचे वाटप करण्यात आले आहे.

## खोल समुद्रात अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या १२ बोटींवर कारवाई

**उरण : प्रतिनिधी**

उरण-मुंबई-रायगड समुद्र परिसरातील ठिकठिकाणी अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या मागील आठवडाभरात आणखी १२ मच्छीमार बोटींवर कारवाई करण्यात आली आहे. याआधीच मागील महिनाभरात २१ मासेमारी बोटींवर कारवाई करण्यात आली असुन कारवाई केलेल्या मच्छीमार बोटींची संख्या ३३वर पोहचली असल्याची माहिती उरण सहाय्यक मत्स्यव्यवसाय परवाना अधिकारी प्रियांका भोय यांनी दिली आहे.



खोल समुद्रातील मासेमारीसाठी बंदीचे आदेश असतानाही आदेशाचे उल्लंघन करून उरण-मुंबई-रायगड समुद्र परिसरातील ठिकठिकाणी अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या मागील ३० दिवसांत एकूण २१ मासेमारी बोटींवर कारवाई करण्यात आली होती. कारवाईनंतरही बंदी काळात बेकायदेशीर मासेमारी सुरू असल्याचे निर्दशनास आले होते. त्यानंतर आता पुन्हा अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या आणखी १२ मच्छीमार बोटींवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती भोय यांनी दिली.

## उरणमध्ये ठाकरे गटाला खिंडार



### पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात शिवसेनेचे उरण तालुका प्रमुख महेंद्र पाटील यांच्या कार्याची घोडदौड सुरूच असून महेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उरणमध्ये पक्षाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात सुरूच आहे. विविध उपक्रमही पक्षाच्या वतीने राबविले जात आहे. त्यामुळे अनेक तरुण, नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर हे शिवसेनेच्या कार्य व विचाराने प्रेरित झाले आहेत. आकर्षित झाले आहेत. त्याच्याच प्रत्यय महेंद्र पाटील यांनी घडवून आणलेल्या पक्ष प्रवेशाने झाला आहे.

उरण तालुक्यातील खोपटा येथील ठाकरे गटाचे शाखाप्रमुख हेमंत पाटील तसेच त्यांच्यासोबत ठाकरे गटाचे कार्यकर्ते दत्तात्रेय पाटील, दिनेश पाटील, दत्ताराम पाटील, जितेंद्र पाटील, धीरज पाटील, किरण पाटील, राजेश मुंबईकर, अमर शिंदे यांनी शिवसेना तालुका प्रमुख महेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार महेंद्र थोरवे आणि जिल्हाप्रमुख संतोष शेठ भोईर यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेब भवन कर्जत, जिल्हा रायगड येथे पक्ष प्रवेश केला.

या वेळी शिवसेनेचे अनिकेत पाटील आवरा पंचायत समिती विभाग प्रमुख, विकास पाटील, वेशवी शाखा प्रमुख रोहन पाटील, सुनील घरत, चंद्रकांत पाटील आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. तरुणांचा कल शिवसेनेकडे वाढत चालला असून अजून मोठ्या प्रमाणात पक्ष प्रवेश घडवून आणणार असल्याचे या वेळी शिवसेनेचे उरण तालुका प्रमुख महेंद्र पाटील यांनी सांगितले.

## स्व.चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे स्फुर्तिस्थान स्व.चांगु काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि.१३) सकाळी १०. ३० वाजता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी (निवृत्त आयएएस) व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमल, पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीता पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, नितीन पाटील, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला असणार आहे.

या सोहळ्यामध्ये सर्व पालक व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांनी केले आहे.

## मतदार नोंदणीचे आवाहन

**उरण : वार्ताहर**

ज्या नागरिकांचे नाव मतदार याद्यांमध्ये नाही त्यांनी पुन्हा मतदार नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन उरण विधानसभा आमदार महेश बालदी यांनी केले आहे. यासाठी त्यांनी उरणमध्ये अनेक ठिकाणी फलक लावून आवाहन केले आहे.

यामध्ये लोकसभा निवडणुकीत आपले मतदान गहाळ झाले असल्यास १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांनी मतदाता नोंदणी करा, नाव, पत्ता, जुना फोटो, यात बदल अथवा दुरुस्ती करणे, मोबाईल नंबर अपडेट करा. यासाठी पासपोर्ट साईज एक फोटो, वयाचा पुरावा पॅनकार्ड, जन्माचा दाखला, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, शाळा सोडल्याचा दाखला. (यापैकी कोणतीही एक झेरॉक्स प्रत) नाव दुरुस्ती, वय, पत्ता यातील चूक दुरुस्तीसाठी आधार कार्ड हे मतदार कार्डला जोडण्यासाठी, रहिवासी पुरावा - आधार कार्ड, पासपोर्ट कॉपी, वीज बिल, मालमत्ता कर पावती, बँक पास बुक (या पैकी कोणतीही एक झेरॉक्स प्रत) असणे आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

नोंदणीसाठी उरण न्यायालयाच्या बाजूला आर्श अपार्टमेंट, सकाळी १० ते दुपारी २ अथवा दुपारी ३ ते सायं ६ पर्यंत नोंदणी करता येणार आहे. नोंदणीची शेवटची तारीख २० जुलै २०२४ आहे. समस्त नागरिकांनी पुन्हा मतदार नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन आमदार महेश बालदी यांनी केले आहे.

## स्व. चांगू काना ठाकूर यांचा पुण्यतिथी सोहळा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वानंद सुख निवासी चांगू काना ठाकूर यांचा पुण्यतिथी सोहळा शिवाजी नगर येथील बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात मंगळवारी आणि बुधवारी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्या अंतर्गत बुधवारी (दि. १०) माऊलींवर पुष्पवृष्टी करण्यात आली. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर उपस्थित होते. तसेच या पुण्यतीथी सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनीही भेट देत दर्शन घेतले.

या पुण्यतिथी सोहळ्यामध्ये मंगळवारी सकाळी १० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ आणि श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरितामृत ग्रंथाचे पारायण वाचन करण्यात आले तसेच बुधवारी सकाळी आठ वाजता खारघर रांजनपाडा येथील नादब्रम्हा भजन मंडळ यांचे भजन झाले. त्यानंतर सकाळी दहा वाजता बाळासाहेब महाराज यांनी प्रवचन सादर केले तसेच दुपारी १२ वाजता पुण्यतिथी निमित्ताने माउलींवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

या वेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, शकुंतला ठाकूर, सागर ठाकूर, अरुण ठाकूर, भरतशेठ ठाकूर, माजी उपसरपंच विजय घरत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विरेंद्र पाटील, दीपक ठाकूर, राज ठाकूर, रमण ठाकूर, गजानन ठाकूर, पद्माकर ठाकूर, बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), अप्पा पांचाळ महाराज (चिपळूण), निवृत्तीबुवा चौधरी, पनवेल पंचायत समिती माजी सदस्या रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, सी.एल.ठाकूर, शीतल मोकल, शिवाजी ठाकूर, चंद्रभागा घरत, राधाताई ठाकूर, रवी भोईर, भागीरथी मोकल, कमलाबाई पाटील, अत्माराम मोकल, चैतन्य लाड, रायबा तात्या, प्रतीक ठाकूर, अमोघ ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील न्यू इंग्लीश स्कूलचे मुख्याध्यापक सुरेश चाळके हे सेवानिवृत्त झाले आहे. या बद्दल त्यांनी रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची बुधवारी सदीच्छा भेट घेतली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चाळके यांना शुभेच्छा दिल्या.**

## कामोठ्यातील समस्यांबाबत खासदार बारणेंना निवेदन

**खारघर : प्रतिनिधी**

कामोठे शहरात भर पावसाळ्यात अपुऱ्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. शहराला ४० एमएलडी पाण्याचा तुटवडा भासत असताना केवळ २५ ते ३० एमएलडी पाणी शहराला मिळत आहे. याबाबत कामोठे मधील शिवसैनिकांनी खासदार श्रीरंग बारणे यांची भेट घेत याबाबत तोडगा काढण्याची विनंती माजी शहरप्रमुख राकेश गोवारी यांनी केली आहे.



राकेश गोवारी यांच्यासोबत माजी शिवसेना शहरसंघटक कामोठे सोबत बबन काळेदेखील उपस्थित होते. शहरातील नागरिकांचे दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात आले आहे तसेच विजेची मागणी वाढली असताना तीही अपुरी पडते त्यामुळे वारंवार विजेचा गायब खेळ खंडोबा होतो. कामोठ्याचे स्वतःचे विद्युत उपकेंद्र असणे गरजेचे आहे. शहरात खेळाडूंसाठी एकही क्रिडांगण राखीव नाही. कामोठे विभागात पोस्ट ऑफिससाठी हक्काची जागा उपलब्ध व्हावी कारण सध्या एका भाडयाच्या अपुऱ्या जागेत पोस्टाचा कारभार सुरु असल्याचे राकेश गोवारी यांनी सांगितले. याबाबत सिडको प्रशासनासोबत बैठकीचे आयोजन करून या सर्व प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढला जाईल, असे आश्वासन बारणे यांनी गोवारी यांना दिले.

## संपादकीय

# नि:संदिग्ध भूमिका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या ताज्या रशियाभेटीदरम्यान रशियन सैन्यात कार्यरत असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षित मायदेशी परतण्याचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर रशियाने त्यास अनुकूलता दर्शवली असून भारतीयांची रशियन सैन्यातील भरती रोखण्यासही मान्यता दिली आहे. पंतप्रधान मोदी यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबतच्या अनौपचारिक भेटीदरम्यान हा मुद्दा प्राधान्याने उपस्थित केला होता.

**भारत आणि रशिया यांच्या मैत्रीला प्रदीर्घ ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. तरीही रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताज्या रशियाभेटीकडे विशेषत: अमेरिकाप्रणीत रशियाविरोधी देशांचे बारकाईने लक्ष होते. त्यात नेमक्या मोदींच्या भेटीवेळीच म्हणजे सोमवारी रशियाकडून युक्रेनवर ४० क्षेपणास्त्रांचा हल्ला झाला. यातील एक क्षेपणास्त्रामुळे युक्रेनमधील एक बालरुग्णालय उद्ध्वस्त झाले. या घटनेत दोन मुले मृत्यूमुखी पडली तर अनेक मुले जखमी झाल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी मोदी आणि पुतिन यांच्या भेटीबद्दल खेद व्यक्त केला. ज्या दिवशी रशियन क्षेपणास्त्राने युक्रेनमधील लहान मुलांचे रुग्णालय उद्ध्वस्त केले, त्याच दिवशी जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या नेत्याने मॉस्कोमधील सर्वात मोठ्या गुन्हेगाराला मिठी मारणे हे प्रचंड निराशाजनक आहे, असे विधान झेलेन्स्की यांनी केले. त्यानंतर मोदींनीही तातडीने समतोल साधत, रशिया आणि युक्रेनदरम्यानचा प्रश्न युद्धभूमीवर सुटू शकणार नाही असे पुतिन यांच्यासोबतच्या चर्चेत नि:संदिग्धपणे सांगितले. मोदींचे अशातऱ्हेने युक्रेन युद्धाबद्दल भारताची भूमिका स्पष्ट करणे आवश्यकच होते. या आठवड्याच्या अखेरीस वॉशिंग्टनमध्ये 'नाटो' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचा विषय 'युक्रेन' हाच आहे. त्यामुळेच 'नाटो'शी संबंधित राष्ट्रांचे लक्ष मोदी-पुतिन भेटीकडे होते. तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतरची मोदी यांची ही पहिलीच रशियाभेट होती. मोदींच्या भेटीवेळीच रशियाने युक्रेनवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे मोदींची आंतरराष्ट्रीय स्तरावर काहीशी पंचाईत झाली खरी, परंतु भारताने कायमच स्वायत्त आणि सार्वभौम परराष्ट्र धोरण स्वीकारले आहे. रशियाशी भारताचे पूर्वापार मैत्रीसंबंध आहेत तर अलीकडच्या काळात अमेरिकेशीही भारताचे मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले आहेत. चीनच्या वाढत्या दादागिरीमुळे अमेरिकेशीही उत्तम संबंध राखणे भारतासाठी आवश्यक आहे. दुसरीकडे अमेरिका व पाश्चात्य राष्ट्रे युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाला एकटे पाडू पाहात असताना रशियाची चीनशी जवळीक वाढते आहे. या आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे भारताला अलीकडच्या काळात अमेरिका व रशिया या दोन्ही राष्ट्रांशी उत्तम संबंध जोपासण्याची कसरत करावी लागते आहे. तेच धोरण कायम राखत, मोदींनी अलीकडच्या रशिया भेटीत त्या देशाला 'ऑल-वेदर फ्रेंड' अर्थात सार्वकालिक मित्र संबोधले. परंतु त्याचवेळेस युक्रेनवरील हल्ल्याची दखलही घेतली. वास्तविक युक्रेन युद्धानंतर पाश्चिमात्य देशांनी रशियावर घातलेल्या निर्बंधांमुळे रशियातील स्वस्त खनिज तेलाचा लाभ भारताला झाला. आजच्या घडीला इराक आणि सौदी अरेबिया या नेहमीच्या खनिजतेल पुरवठादारांपेक्षा अधिक खनिज तेल भारत रशियाकडून घेतो आहे. देशातील गरज भागवल्यानंतर उर्वरित खनिज तेलाचे शुद्धीकरण करून भारत ते युरोपला विकतो. आजही भारताला आवश्यक असलेली संरक्षणविषयक सामग्री प्रामुख्याने रशियाकडूनच आयात केली जाते. गेल्या काही वर्षांत अमेरिकेसह इस्रायल आणि फ्रान्सकडूनही आपल्याला संरक्षणविषयक सामग्री मिळू लागली आहे, परंतु या अन्य देशांकडून मिळणाऱ्या अशाप्रकारच्या सामग्रीपेक्षा रशियन सामग्रीचे प्रमाण खूपच अधिक आहे. या पार्श्वभूमीवरच आपल्या रशियामैत्रीच्या ताज्या कसरतीकडे पहावे लागेल.**

# कांगोरीगड संवर्धनाच्या प्रतीक्षेत

**खबरबात**
शैलेश पालकर





पोलादपूर तालुक्यातील मंगळगड म्हणजेच कांगोरीगड किल्ल्याचा समावेश गडकिल्ले संवर्धन योजनेमध्ये करण्यासाठी रायगडमधील महायुतीतील कॅबिनेटमंत्री ना.आदिती तटकरे यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पोलादपूर तालुक्यातील गड-किल्ले आणि ऐतिहासिक स्थळांची जोपासना करण्याकडे काहिसे दुर्लक्ष झाले आहे.

महाड आणि पोलादपूर तालुक्याच्या सीमेवरील गड चंद्रराव मोरे यांच्याकडून हा कांगोरीगड हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला आणि याचे नामकरण 'मंगळगड' असे केले, मात्र अद्याप छत्रपती शिवाजी महाराजांनी ठेवलेले हे नाव परिसरातही प्रचलित झाले नाही. त्या काळी प्रामुख्याने कैदी ठेवण्यासाठी या किल्ल्याचा वापर होत असे. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडास वेढा पडला तेव्हा तेथील धनसंपत्ती प्रथम कांगोरीगड येथे हलवून त्यानंतर पन्हाळा किल्ल्यावर नेली. इ.स.१८१७मध्ये सरदार बापू गोखले यांनी मद्रास रेजिमेंटमधील कर्नल हंटर व मॉरीसन या इंग्रज अटक करून मंगळगडावर तुरुंगात ठेवले होते. इ.स १८१८मध्ये कर्नल प्रॉथर या इंग्रजाने हा किल्ला जिंकला.

महाडपासून दीड तास अंतरावरील पिंपळवाडी इथून जवळ-जवळ कांगोरीगडाच्या अर्ध्यापर्यंत चारचाकी वाहन जाऊ शकेल, असा कच्चा रस्ता अलिकडेच आमदार भरत गोगावले यांच्या प्रयत्नाने बांधण्यात आला आहे, तर दुसरा रस्ता हा पोलादपूर या तालुक्याच्या ठिकाणापासून अंदाजे २४-२५ किमी अंतर असलेल्या सडे या गावातून आहे. सडे गावाच्या पुढे काही अंतरावर वडघर गावातूनही गडावर जाण्यासाठी दोन रस्ते आहेत. पोलादपुरातीलाच ढवळे या गावातून कांगोरीगडावर जाण्यासाठी सहा तास लागतात. एकाच मोहिमेत चंद्रगड आणि कांगोरीगडावर चढाई करायची असल्यास गिर्यारोहक हा मार्ग अवलंबतात.

वरंध घाटातील माझेरी या गावातून सहा तासांचे अंतर आहे. कांगोरीगडाकडे जाणाऱ्या गुराखी सांगू शकतील अशा ढोरवाटा असंख्य आहेत, मात्र प्रत्यक्षात या सर्व एकाच ठिकाणी साधारणत: येऊन गडाकडे जाण्याची एकच वाट दिसते. स्थानिक नवरा-नवरीचे सुळके म्हणतात अशा नैसर्गिक ट्वीन टॉवरप्रमाणे सुळक्यांच्या खालून गडावर जाण्याची एकमेव वाट जाते. हा सुळका नजरेच्या टप्प्यात ठेवला तर गिर्यारोहकांसाठी कुठूनही वाट शोधून गडावर चढाई करता येईल. पिंपळवाडीतून जाणारी गडावर जाणारी वाट ही प्रसिद्ध मळवाट आहे आणि आता तिकडून गडावर जाण्यासाठी अर्धा रस्ताही बांधला असला तरी साहसाची आवड असणाऱ्या तरुण साहजिकच सडे या गावातून चढाई करतात. केवळ दोन तासांत शर्थीचे प्रयत्न केल्यास चढाई पूर्ण होते.

नऊ वर्षांपूर्वी या कांगोरीगडाच्या परिसरात विशेषत: तालुक्याच्या कानाकोपऱ्यात राहणारी शहरी तसेच ग्रामीण जीवन जगणारी आठ जणांच्या तरूणाईला अनिल मालुसरे यांनी या गडाच्या स्वच्छता मोहिमेसाठी उद्युक्त केले होते. एक तासानंतर गोठवलीतून येणारी वाट आणि सडेतून आलेली वाट एका खिंडीत मिळतात, असे दिसून आल्यानंतर त्यानंतरच्या अर्ध्या तासाने पिंपळवाडीतून येणारी वाटही या नेहमीच्या चढाईच्या वाटेला जोडली आहे. डोक्यावर असणाऱ्या गर्द हिरवाईच्या आच्छादनाने उन्हापासून चांगलाच बचाव होतो. सरळसोट वाढलेले मजबूत बुंध्यांचे मोठमोठाले वृक्ष आणि त्यांना गच्च लपेटलेल्या गर्द घनदाट वेलींनी त्या पायवाटेवर मंडप तयार केला आहे. त्या झाडाझुडूपांतून बाहेर आल्यानंतर काळा कातळ जो अगदी सरळ रायगडाच्या टकमक टोकासारखा दिसू लागतो. येथेच असलेले प्रवेशद्वार भग्नावस्थेत आहे, केवळ शेजारील विटांचे गोलाकार बांधकाम बघून तेथे असलेल्या प्रवेशद्वाराची कल्पना येते. तिथून पुढे आल्यावर डाव्या हाताला निमुळती होत असलेली माची आणि उजव्या हाताला बालेकिल्ल्याकडे जाणारी वाट दिसते. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे पायवाटेवर वाऱ्याच्या झुळूकीसरशी लवणाऱ्या मऊशार हिरव्यांकंच पोपटी गवताची झालर हळुवार स्पर्श करीत असल्याचा अनुभव या चढाईतला थकवा दूर करणारा असतो.

उजव्या हाताला कातळात खोदलेले पाण्याचे दोन टाके आहेत, तर समोर कांगुरीनाथाचे मंदिर आहे. गाभाऱ्यात कांगुरीनाथासह काळभैरव, शिवलिंग यांचे पाषाण आणि घोड्याच्या पाच मूर्ती तसेच इतर दोन मूर्ती आहेत. बाहेरील सभामंडपात आणखी काही भग्नावस्थेतील पाषाण आहेत. स्थानिक लोक येथे येऊन देवाला राखण म्हणजेच बळीही देतात. सभामंडपातच नैवेद्य शिजवण्यासाठी बादली, मोठाले टोप, पलेता, तांब्या, ताट अशी भांडी आहेत. याठिकाणी चूल मांडल्याने राख उडून मंदिर परिसर अस्वच्छ झाला होता, तसेच कोंबड्यांची पिसेही तिथेच टाकल्याने मंदिराच्या पावित्र्याला बाधा येत असल्याचे जाणवले.

या प्रथम गाभारा आणि सभामंडप स्वच्छ करून दीप प्रज्वलित केल्यानंतर वातावरण प्रसन्न होते आणि परिसर मंगल आणि पवित्र वाटू लागतो. या मंदिराच्या पाठीमागे असलेल्या माचीवरून नयनरम्य दृश्य दिसते. माचीला जवळ-जवळ अर्धा किमी आणि २०-३० फूट उंच तटबंदी आहे. यावरून ढवळी व कामथी नद्यांचे खोरे पूर्ण दृष्टीपथात येतात. कांगोरीगडावरील पाण्याची दोन्ही टाक पालापाचोळा पडलेली आहेत. उजव्या हाताला असणाऱ्या वाटेवर बालेकिल्ला आहे. सुरुवातीला अत्यंत निमुळती असून एकावेळी एकच माणूस जाऊ शकत असल्याने जरा जपूनच मार्गाक्रमण करीत होते.

साधारणत: ५०मीटर अंतरावर गडावरील सर्वात मोठे टाके आहे. त्यातील पाणी जरा बरे स्वच्छ पिण्यायोग्यही आहे. गडावरील या टाक्यात बारमाही पाणी असते. बालेकिल्ल्यावर तीन भग्न वाडे आहेत. सुरुवातीला नुसता जोता असून त्याच्यापुढे दोन शिवलिंग पाषाणात घडवलेली आहेत. त्यापुढील दोन वाडयांच्या भिंती दोन पुरुष उंच असून त्यांना एकच खिडकी असल्याने त्यांचा वापर कैदी डांबण्यासाठी होत असावा असा अंदाज करता येतो. या वाड्यांच्या मागे जाणारी वाट तटापर्यंत जाते. तटावरून खाली पाहिल्यास आलेल्या वाटेचा अंदाज येऊ शकतो. हा तट २०-३० फुट उंच बांधला आहे. गडावरची भुसभुशीत असल्याने प्रत्येक पाऊल सावधपणे ठेवावे लागते. या मातीला येथे 'गांडूळकी'ची माती म्हणतात. या मातीवरून पाय घसरण्याची शक्यता असते, मात्र तरीही माती अत्यंत सुपीक असल्यामुळे एकवेळ पाऊस पडला तरी गवत गुडघाभर उंच वाढते. कांगोरीगडावर झाडे खूप आहेत. कडीपत्ता आणि काटेरी वांग्याची झाडे दिसून येतात.

कांगोरीगडावर गडभ्रमंती मोहिमेला वाव चांगलाच आहे. शिवाय शिवकालीन गडकिल्ल्यांमध्ये रमल्याचा आनंदही भरपूर असल्याने या दुर्गभ्रमंतीचे वेड घेऊन कांगोरीगडावर स्वारी केलेल्या तरूणांना मिळणारी स्फूर्ती गडावर वारंवार येण्यास खुणावेल.




## मेटा एआय व्हॉट्सॲपवरच करून देणार फोटो एडिट

एखादा फोटो सोशल मीडियावर अपलोड करण्यापूर्वी आपण सगळ्यात आधी तो थोडा एडिट करतो, कारण अनेकदा फोटो काढताना बॅकग्राऊंडमध्ये एखादी व्यक्ती, वस्तू फोटोत दिसते आणि ती रिमूव्ह करण्यासाठी मेहनत घ्यावी लागते. त्यासाठी अनेक एडिटिंग ॲप्सचा उपयोग करतो, पण आता चिंता करण्याची गरज नाही, कारण त्यासाठी मेटा एआय मदत करणार आहे.





काही दिवसांपूर्वीच मेटाने त्यांच्या मेसेजिंग ॲप व्हॉट्सपवर मेटा एआय हे नवीन फीचर आणले आहे, ज्याला तुम्ही चॅट जीपीटीप्रमाणे सगळे काही काही विचारू शकता. एखाद्या विषयाची माहिती असो किंवा एखादा पिकनिकचा प्लॅन करायचा असो; मेटा एआय तुम्हाला संदर्भासह स्पष्टीकरण चुटकीसरशी देणार आहे. मेटा कंपनीने व्हॉट्सपवर नवीन एआय capability चाचणी सुरू केली आहे. त्यामुळे आता मेटा एआयच्या मदतीने तुम्हाला फोटो सहज एडिट करता येणार आहेत.

व्हॉट्सपवर बीटा आवृत्ती २.२४.१४.२० वर वापरकर्त्यांसाठी मेटा एआयच्या वतीने दोन नवीन Capabilities ऑफर्स दिल्या जात आहेत. फोटो अपलोड करणे व त्याबद्दल प्रश्न विचारणे तसेच टेक्स्ट प्रॉम्प्ट वापरून, ते फोटो एआयद्वारे एडिट करून घेणे अशा दोन ऑफर्स आहेत. त्यासाठी तुम्हाला तळाशी उजव्या कोपऱ्यातील कॅमेरा बटण वापरून तुमचे फोटो तुम्हाला अपलोड करावे लागतील किंवा एखादा फोटो कॅप्चर करून, तुम्ही तो एडिट करून घेऊ शकता. मेटा असेही म्हणते की, अपलोड केलेल्या फोटोच्या चेहऱ्यावरील फीचर्स एआयद्वारे विश्लेषित केल्या जातील तसेच वापरकर्ते हे फोटो कधीही डिलीटसुद्धा करू शकतात. मेटा एआय व्हॉट्सॲपवर कशा प्रकारे इमेज एडिटिंग करून देऊ शकते याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. इतर एआयवर चालणाऱ्या इमेज एडिटिंग टूल्सचा विचार करता मेटा एआय फोटोतील एखादी वस्तू काढून टाकण्यास बॅकग्राऊंड काढून तुमच्या फोटोचे स्वरूप बदलून देऊ शकते. व्हॉट्सॲपवरील मेटा एआय कंपनीच्या नवीन व सर्वांत सक्षम लार्ज लँग्वेज जनरेटिव्ह एआय मॉडेल Llama३वर आधारित आहे, जे मल्टीमोडॅलिटीला सपोर्ट करते तसेच हे एआय टेक्स्ट, आवाज, फोटो, मजकूर, आवाज समजून घेऊन त्याला टेक्स्ट, आवाज व फोटोसह रिस्पॉन्स किंवा रिप्लायसुद्धा देऊ शकते. व्हॉट्सॲपव्यतिरिक्त मेटाने फेसबुक, इन्स्टाग्राम प्लॅटफॉर्मवरही एआयदेखील सादर केले आहे.

# प्रसिद्ध गीतकार शांताराम नांदगावकर

**निमित्त**



'हृदयी वसंत फुलताना' यांसारखी सतत ओठावर खिळणारी गाणी देऊन रसिकांना उत्साहात ठेवणारे गीतकार म्हणून कवी शांताराम नांदगावकर यांची ओळख होती. सहज आणि सुंदर शब्दांची गुंफण असणाऱ्या आणि मनाचा ठाव घेणारी गीते देणारे ज्येष्ठ गीतकार शांताराम नांदगावकर हे मूळचे कोकणातील नांदगावचे. त्यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९३६चा, तर शालेय शिक्षण दादरच्या शिरोडकर हायस्कूलमध्ये झाले. आज त्यांचा स्मृतिदिन...

'पाहिले न मी तुला', 'प्रथम तुला वंदितो', 'ही नव्हे चांदणी', 'दाटून कंठ येतो', आदी त्यांची गीते विशेष गाजली. अष्टविनायक,'नवरी मिळे नवऱ्याला', 'बनवा बनवी', पैजेचा विडा आदी मराठी तसेच हिंदी चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले होते. श्रोत्यांच्या ओठावर खेळतील अशा सहजसुंदर काव्यरचना हे त्यांचे वैशिष्ट्य होते. चित्रपटगीतांबरोबरच बालगीते, भावगीते व लोकगीतेही आणि भक्तीगीतेही लिहिली. 'ससा तो ससा' हे बालगीत आजही मुलांना वेड लावते.

शब्दांमधून जग आणि जगाची रीत उभी करण्याची मोठी ताकद त्यांच्यात होती, परंतु दुर्दैवाने त्यांच्या बहराचा काळ हा मराठी चित्रपट गीत-संगीताच्या दृष्टीने अधोगतीचा होता. त्यामुळे अनेकदा 'बिनडोक' सिच्युएशन्ससाठी गाणी लिहिण्याचे 'व्यावसायिक काम' त्यांना करावे लागले. तरीही जेव्हा केव्हा संधी मिळाली तेव्हा तेव्हा त्यांनी गीतकार म्हणून आपल्या क्षमतेचा प्रत्यय आणून दिला. गीतकार म्हणून त्यांचा प्रवास भावगीताच्या प्रांतात सुरू झाला, तेव्हा चित्रपटसृष्टीत ग.दि.मा, सुधीर फडके, राम कदम, जगदीश खेबुडकर ही समीकरणे ऐन भरात होती.

यानंतरच्या १५ वर्षांत सर्व काही बदलले. या दरम्यान नांदगावकर यांनी भावगीतांच्या प्रांतात मुशाफिरी केली. 'रामप्रहरी राम गाथा'सारखे त्यांचे गाणे पूर्वसूरींशी आणि मराठी भक्तीगीतांच्या सुरेल परंपरेशी नाते सांगणारे होते. १९८०नंतरचा जवळपास दोन दशके मराठी चित्रपट उथळ पाण्यात गटांगळ्या खात होता. नांदगावकर नेमके याच काळात गीतकार म्हणून वावरत होते. १९७९ साली 'अष्टविनायक' या चित्रपटात गाणी लिहून ते खऱ्या अर्थाने 'मेन स्ट्रिम'मध्ये आले, परंतु त्यांनी चित्रपटाबाहेर जशी गाणी लिहिली, उदाहरणार्थ, 'सजल नयन नितधार बरसती', 'रुपेरी वाळूत माडांच्या बनात' तशी त्यांना चित्रपटात लिहिण्याची संधी क्वचितच मिळाली.


'अष्टविनायक'नंतर सचिनच्या बऱ्याच चित्रपटांची गाणी त्यांनी लिहिली आणि संगीतकार अनिल-अरुणसोबत त्यांची 'वेव्हलेंथ' चांगलीच जुळली, परंतु 'धुमधडाका', 'नवरी मिळे नवऱ्याला' नंतर सचिन-महेश-अशोक-लक्ष्या यांची लाट आली. त्यात गीत संगीताला फार वाव नव्हता. त्यातल्या त्यात सचिनच्या काही चित्रपटांत त्यांना बरी गाणी देता आली. 'गंमत जंमत'साठी किशोरकुमार यांना मराठी गाणे द्यायचे ठरले, तेव्हा मराठीतल्या 'ळ'चा उच्चार करता येत नाही आणि 'च'चा उच्चार आपण 'च्य' असा हिंदी पद्धतीने करतो, असे कारण सांगून ते गाण्यासाठी राजी होईनात, पण ही अडचण आव्हान म्हणून स्वीकारत नांदगावकर यांनी, 'प्रिये, जगू कसा तुझ्याविना मी राणी गं' अशी सोपी शब्दरचना केली आणि किशोर कुमार यांनी धमाल उडवून दिली. गाणे अतिशय लोकप्रिय झाले.

शांताराम नांदगावकर १९८५मध्ये विधान परिषदेवर निवडून गेले होते. त्यांचे ११ जुलै २००९ रोजी निधन झाले.

**-संजीव वेलणकर**

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : सुधीर नाझरे)



**मुरुड : परिसरात गेल्या दोन दिवसांपासून दमदार पाऊस पडत आहे. त्यामुळे खारआंबोलीतील शेती जलमय झाली आहे.**

## आरोग्य प्रहर

# तुळशीचे पाणी पिण्याचे अमृतासमान फायदे

प्राचीन काळापासून एक पवित्र वनस्पती म्हणून दारी राहणाऱ्या तुळशीला विशेष मान आहे. तुळशीचे औषधी गुणधर्मसुद्धा अनेक आहेत. अगदी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापासून ते श्वसनाच्या समस्या सोडवण्यापर्यंत अनेक प्रश्नावर तुळशीचे सेवन हे रामबाण उपाय ठरते.



तुळशीला डप्टोजेन मानले जाते, याचा अर्थ तुळस शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करते. तुळशीमध्ये इम्युनोमोडय़ुलेटरी गुणधर्मदेखील असतात, याचा अर्थ ते शरीराची रोगप्रतिकारक प्रतिक्रिया वाढवू शकते. हे गुणधर्म संक्रमण आणि आजारांपासून लढण्यास मदत करू शकतात.

**तणावावर नियंत्रण**

तुळशीचे पाणी शरीराला शांत करू शकते, अंतर्गत हालचालींची लय संतुलित राहते. त्यामुळे ज्यांची जीवनशैली फार तणावग्रस्त आहे त्यांनी दिवसातून एकदा हे तुळशीचे पाणी प्यायल्यास फायदा होऊ शकतो.

**पचनाला मदत**

तुळशीमध्ये कार्मिनेटिव्ह गुणधर्म असतात जे गॅस आणि सूज कमी करण्यास मदत करू शकतात. काही अभ्यासांमध्ये असेही सुचवले आहे. यामुळे आतड्याचे कार्य सुधारू शकते, पचनास मदत होते.

**श्वसनासाठी मदत**

वर्षानुवर्षे तुळशीच्या पानांचा वापर खोकला, सर्दी आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या दूर करण्यासाठी केला जात आहे. तुळशीमध्ये कफनाशक गुणधर्म असतात, कफ बाहेर टाकण्यास आणि रक्त साचून गुठळ्या होण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत करतात. तुळशीचे दाहकविरोधी गुणधर्म घसा खवखवणे किंवा जळजळणाऱ्या श्वसननलिकेस शांत करू शकतात.

**अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस**

तुळशीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्ससारखे विविध अँटिऑक्सिडंट्स असतात. हे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढण्यास मदत करतात. तुळशीच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक अँटिऑक्सिडंट्सचा पुरवठा वाढू शकतो ज्यामुळे अनेक आजरांपासून संरक्षण मिळू शकते. याविषयी अजून सविस्तर संशोधन होण्याची गरज आहे.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ४१(२)] बुधवार, मार्च १३, २०२४/फाल्गुन २३, शके १९४५ [पृष्ठे ८१, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १४०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ मार्च २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते-८. ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम म्हणून करण्यात आला आहे) रेवस रेड्डी सागरी महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र.०५ यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त महामार्ग असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५५) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) व (३) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,-

(एक) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे;

(दोन) विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तीखेरीज उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उप-विभागीय अधिकारी, पनवेल, जिल्हा रायगड यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

***अनुसुची***

*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

**तालुका : अलिबाग** **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | रांजणखार डावली | ५३/अ/ब/१ | १.४२.०० |
| २ | रांजणखार डावली | रस्ता लागु गट नं. ५३, ४८ | ०.०२.०५ |
| ३ | रांजणखार डावली | ४८/अ/२ | ०.००.०८ |
| ४ | रांजणखार डावली | ५३/क/२ | ०.०३.७२ |
| ५ | रांजणखार डावली | ५३/क/१ | ०.००.०५ |
| ६ | रांजणखार डावली | ५३/अ | १.४२.३२ |
| ७ | रांजणखार डावली | ४८/अ/१ | १.००.८० |
| ८ | रांजणखार डावली | रस्ता लागु गट नं.४८, ६७ | २.०२.०४ |
| ९ | रांजणखार डावली | ६७ | ०.०७.६४ |
| १० | रांजणखार डावली | ६० | ०.१०.२८ |
| ११ | रांजणखार डावली | ३४ | ०.३०.८४ |
| १२ | रांजणखार डावली | ३३ | ०.२७.३४ |
| १३ | रांजणखार डावली | ७९ | ०.०७.६१ |
| १४ | रांजणखार डावली | ७८ | ०.१७.४५ |
| १५ | रांजणखार डावली | ३२ | ०.२१.६१ |
| १६ | रांजणखार डावली | ७७ | ०.३३.३२ |
| १७ | रांजणखार डावली | ३१ | ०.०४.७८ |
| १८ | रांजणखार डावली | गावठाण | ०.०१.६६ |
| १९ | रांजणखार डावली | १/अ | ०.०६.५८ |
| २० | रांजणखार डावली | २ | ०.०९.२१ |
| २१ | रांजणखार डावली | ३/अ | ०.०१.१४ |
| २२ | रांजणखार डावली | ३/अ/१ | ०.०५.१४ |
| २३ | रांजणखार डावली | ४ | ०.०७.४७ |
| २४ | रांजणखार डावली | २४ | ०.२२.२२ |
| २५ | रांजणखार डावली | २३ | ०.०६.४८ |
| २६ | रांजणखार डावली | ५ | ०.१२.४८ |
| २७ | रांजणखार डावली | २२ | ०.१०.७१ |
| २८ | रांजणखार डावली | ६ | ०.०७.५९ |
| २९ | रांजणखार डावली | १८ | ०.१०.२५ |
| ३० | रांजणखार डावली | १९ | ०.०४.५० |
| ३१ | रांजणखार डावली | २० | ०.०३.०४ |
| ३२ | रांजणखार डावली | २१ | ०.००.२२ |
| ३३ | रांजणखार डावली | ४९ | ०.०७.७९ |
| ३४ | रांजणखार डावली | १७ | ०.१०.०७ |
| ३५ | मिळकतखार | १५४ | ०.०६.६० |
| ३६ | मिळकतखार | १५२ | ०.००.८३ |
| ३७ | मिळकतखार | १५३ | ०.०७.१३ |
| ३८ | मिळकतखार | १०८ | ०.०२.४२ |
| ३९ | मिळकतखार | १०७ | ०.०३.६५ |
| ४० | मिळकतखार | ९१ | ०.०३.९४ |
| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
| (१) | (२) | (३) | (४) |
| ४१ | मिळकतखार | ८९ | ०.०३.९६ |
| ४२ | मिळकतखार | ८८ | ०.०१.४६ |
| ४३ | मिळकतखार | ८४ | ०.०८.५४ |
| ४४ | मिळकतखार | ७६ | ०.०७.४३ |
| ४५ | मिळकतखार | ६४ | ०.००.५४ |
| ४६ | मिळकतखार | ६३ | ०.००.८२ |
| ४७ | मिळकतखार | ६२ | ०.००.६० |
| ४८ | मिळकतखार | २४४ | ०.०३.०५ |
| ४९ | मिळकतखार | २४५ | ०.०१.४५ |
| ५० | मिळकतखार | २४६ | ०.००.७१ |
| ५१ | मिळकतखार | २४७ | ०.०६.२१ |
| ५२ | मिळकतखार | २४८ | ०.००.४६ |
| ५३ | मिळकतखार | २४९ | ०.०७.५३ |
| ५४ | मिळकतखार | ३४१ | ०.१६.७८ |
| ५५ | मिळकतखार | ३४२ | ०.११.१७ |
| ५६ | मिळकतखार | ३४३ | ०.०६.९२ |
| ५७ | मिळकतखार | ३४६ | ०.०४.०३ |
| ५८ | मिळकतखार | ३४७ | ०.०१.६९ |
| ५९ | मिळकतखार | ३४९ | ०.०७.३५ |
| ६० | मिळकतखार | ३५० | ०.०१.६६ |
| ६१ | मिळकतखार | ३५१ | ०.००.९१ |
| ६२ | मिळकतखार | ३५२ | ०.००.९० |
| ६३ | मिळकतखार | ३५४ | ०.०९.२१ |
| ६४ | मिळकतखार | ३५५ | ०.०४.५५ |
| ६५ | मिळकतखार | ५३७ | ०.३४.५७ |
| ६६ | मिळकतखार | २४ | ०.०१.२२ |
| ६७ | मिळकतखार | २३ | ०.००.१२ |
| ६८ | मिळकतखार | २५ | ०.०३.४० |
| ६९ | मिळकतखार | २६ | ०.००.६९ |
| ७० | मिळकतखार | २९ | ०.०२.१२ |
| ७१ | मिळकतखार | ३९ | ०.०३.५५ |
| ७२ | मिळकतखार | ४३ | ०.००.५३ |
| ७३ | मिळकतखार | ४४ | ०.००.५९ |
| ७४ | मिळकतखार | ४५ | ०.०३.२१ |
| ७५ | मिळकतखार | ४९ | ०.०१.२१ |
| ७६ | मिळकतखार | ५० | ०.०१.१७ |
| ७७ | मिळकतखार | ५१ | ०.०१.६८ |
| ७८ | मिळकतखार | ५२ | ०.०४.४९ |
| ७९ | मिळकतखार | ६१ | ०.०५.१६ |

***अनुसुची***

*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

***तालुका : अलिबाग*** ***जिल्हा : रायगड***

| अ.क्र. | गावाचे नाव | गट नंबर/सर्व्हे नंबर | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | चौल | ५३९ | ०.०७.३८ |
| २ | चौल | ५५९ | ०.२८.०६ |
| ३ | चौल | ५५८ | ०.१८.३७ |
| ४ | चौल | ५६३ | ०.०१.७० |
| ५ | चौल | ५५७ | ०.४३.६४ |
| ६ | चौल | ५४१ | ०.०९.९१ |
| ७ | चौल | ५४६ | ०.०४.७७ |
| ८ | चौल | ५४२ | ०.०१.०८ |
| ९ | चौल | ५४७ | ०.०३.३२ |
| १० | चौल | ५५६ | ०.१६.८६ |
| ११ | चौल | ५४८ | ०.००.०१ |
| १२ | चौल | ५४९ | ०.२२.२३ |
| १३ | चौल | ४९६ | ०.०१.४० |
| १४ | चौल | ४९५ | ०.२०.६२ |
| १५ | चौल | ४९७ | ०.१०.७० |
| १६ | चौल | ४९८ | ०.०४.७८ |
| १७ | चौल | ५५० | ०.१५.२४ |
| १८ | चौल | ४२५ | ०.००.१५ |
| १९ | चौल | ४९९ | ०.१५.२९ |
| २० | चौल | ४९३ | ०.०९.८९ |
| २१ | चौल | ४९४ | ०.११.११ |
| २२ | चौल | ४३२ | ०.००.२९ |
| २३ | चौल | ४२८ | ०.०९.४८ |
| २४ | चौल | ४२९ | ०.०४.६४ |
| २५ | चौल | ४३० | ०.०९.६५ |
| २६ | चौल | ४२६ | ०.०७.५६ |
| २७ | चौल | ४०० | ०.२१.२२ |
| २८ | चौल | ४२७ | ०.३६.२४ |
| २९ | चौल | ३९६ | ०.०१.९६ |
| ३० | चौल | ३९९ | ०.१७.८१ |
| ३१ | चौल | ३६९ | ०.००.८४ |
| ३२ | चौल | ३६३ | ०.१६.३९ |
| ३३ | चौल | ३६७ | ०.०३.७० |
| ३४ | चौल | ३६८ | ०.०९.८४ |
| ३५ | चौल | ३६२ | ०.११.४९ |
| ३६ | चौल | ३६० | ०.०९.३५ |
| ३७ | चौल | ३६१ | ०.१०.६० |
| ३८ | चौल | ३३७ | ०.१७.०१ |
| ३९ | चौल | ३२९ | ०.०४.९७ |
| ४० | चौल | ३३६ | ०.०८.३४ |

पान ७ वर...

# नवी मुंबईत आपत्तीबाबत दक्षता

## महापालिका कर्मचाऱ्यांना एनडीआरएफमार्फत प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे यांच्या वतीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिकेतील अधिकारी – कर्मचारी यांच्यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात करण्यात आले होते.



या वेळी बोलताना नवी मुंबई महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे प्रमुख तथा प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांनी कोणतीही आपत्ती सांगून येत नाही, त्यामुळे नेहमी सतर्क राहणे गरजेचे असून त्यादृष्टीने ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून या विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. कोणत्याही आपत्तीत एनडीआरएफ जवान ज्या समर्पित भावनेने नियोजनबध्द मदतकार्य करतात ते स्पृहनीय असल्याचे सांगत त्यांनी एनडीआरएफमार्फत मंगळवारी मिळणारे प्रशिक्षण नवी मुंबईतील शहर आपत्ती व्यवस्थापनासाठी अत्यंत उपयोगी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी ठाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अनिता जवंजाळ, यशदाचे मुख्य प्रशिक्षक योगेश परदेशी तसेच एनडीआरएफचे निरीक्षक जालिंदर फुंडे उपस्थित होते. पूर, भूकंप, चक्रीवादळ, भूस्खलन, त्सुनामी, इमारत कोसळणे, दरड कोसळणे, वायू अथवा रासायनिक गळती, अपघात अशा आपत्तीच्या प्रसंगी एनडीआरएफ कशा प्रकारे कार्यवाही करते याची विस्तृत माहिती देत एनडीआरएफचे निरीक्षक जालिंदर फुंडे यांनी एनडीआरएफची मदत कुठे घेता येऊ शकते यावर भाष्य केले.

२००५ च्या आपत्ती व्यवस्थापन कायदयानुसार आपत्तीबाबत कार्यवाही केली जात असल्याची माहिती देत त्यांनी विविध प्रकारच्या आपत्तींची व त्या अनुषंगाने घ्यावयाच्या खबरदारी व कार्यवाहीची सादरीकणाद्वारे माहिती दिली. वेगवेगळ्या प्रकारच्या आपत्तींची बाबनिहाय माहिती देत आपत्तीआधी, आपत्तीप्रसंगी व आपत्तीनंतर करावयाच्या सुरक्षित कार्यवाहीविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले. तसेच आपल्या सहकाऱ्यांसह प्रात्याक्षिके दाखविली.

नवी मुंबई महानगरपालिकेचे विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, स्वच्छता मित्र, सुरक्षारक्षक तसेच शासनाच्या महसूल विभागातील कर्मचारी यांनी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतला.

नवी मुंबई महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ठाणे यांच्या माध्यमातून एनडीआरएफच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या समुदाय आधारित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचा उपयोग नवी मुंबई महापालिकेची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षमीकरणासाठी होणार आहे.

### मदतकार्याची प्रात्यक्षिकेही सादर

आपत्तीप्रसंगी कोणतेही शासकीय मदतकार्य पोहचेपर्यंत घरातल्या टाकाऊ अशा साध्यासाध्या वस्तूंपासून आपत्तीप्रसंगी बचाव करणारे साहित्य सहजपणे बनवता येऊ शकते याबद्दलची माहिती त्यांनी दिली तसेच अशी साहित्य प्रदर्शितही केली. या वेळी आपत्तीप्रसंगी प्राथमिक स्वरुपात आरंभी करावयाच्या मदतकार्याची प्रात्यक्षिकेही एनडीआरएफ जवानांनी सादर केली.

# फ्लेमिंगो मृत्यूप्रकरणी होणार चौकशी

**नवी मुंबई : बातमीदार**

कांदळवने ही फ्लेमिंगोंचे (रोहित पक्षी) अधिवास आहेत. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील फ्लेमिंगोंचे हे अधिवास पार्क विकासित आणि संरक्षित करण्याकरिता आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी वन विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल. या समितीने दोन महिन्यांत याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले जातील, अशी माहिती वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत दिली.

नेरूळ सीवूड्स येथील डीपीएस तलावाजवळ फ्लेमिंगोच्या झालेल्या मृत्यूबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या वेळी झालेल्या चर्चेदरम्यान मुनगंटीवार बोलत होते. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई येथे फ्लेमिंगोंचा अधिवास चांगला आहे. इराण, मध्य आशिया आदी ठिकाणांहून फ्लेमिंगो हजारो किलोमीटरचा प्रवास करून या भागात येतात. येथील कांदळवने ही त्यांची अधिवास क्षेत्रे आहेत.

कांदळवन हे फ्लेमिंगोंचे सुरक्षा कवच असल्याने ते जपले पाहिजे. त्यामुळे या क्षेत्राचे नुकसान करणाऱ्यांना आर्थिक दंडासोबतच आता शिक्षेची तरतूद करण्याबाबतचा विचार केला जात असल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितले तसेच मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील हा अधिवास अधिक संरक्षित करण्यासाठी वन विभागाच्या प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात येणाऱ्या समितीत बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव, सिडको, महापालिकेचे अधिकारी, नगरविकास विभागाचे अधिकारी यांचा समावेश असेल, असेही त्यांनी सांगितले.

नेरूळ सीवूडस (नवी मुंबई) येथील डीपीएस तलावाजवळ सहा फ्लेमिंगो पक्ष्यांचा झालेल्या मृत्यूबाबत चौकशी करण्यात आली. त्यांचे शवविच्छेदन केले असता चार पक्ष्यांचा मृत्यू हा श्वसनक्रिया थांबल्याने झाल्याचे कारण समोर आले आहे. इतर दोन पक्ष्यांचे मृतदेह भग्नावस्थेत असल्याने त्याचे कारण समजू शकले नाही.

### एलईडी दिवे बसविण्याची शिफारस

स्थळ पाहणीनंतर अधिकाऱ्यांच्या पथकाने त्या तलावाशेजारील रस्त्यांवर असलेले एलईडी दिवे बदलून तिथे लो प्रेशर सोडियम दिवे अथवा पिवळ्या रंगांचे एलईडी दिवे बसविण्याची शिफारस केल्याची माहितीही मंत्री मुनगंटीवार यांनी दिली.


Adv Asha Arunkumar Bhagat
Mobile No. 8108355000

**Public Notice**

नि/8
ने.ता. 20/08/24

**IN THE COURT OF HON'BLE C.J.S.D. AT PANVEL CIVIL MISC. APP.NO 844/2024**

Exhibit No.

Shri Subrata Ananta Pramanik ......... **Applicants**
and others 2

1) Shri Subrata Ananta Pramanik
Age 65 years, Business-Retired
Residing at 12 Suvidha CHS Ltd,
Plot 14, Sector 5, New Panvel
Taluka Panvel District Raigad 410206

2) Shri Swastik Subrata Pramanik ...... **Applicants**
Age 34 years Business-Service
Residing at 19107, Sobha Dream
Acres Panathur Main Road,
Balagere Village Vanthur,
Bengalure Karnataka 560087

3) Smt Shreshtha Pratik Mukherjee
Age 28 years Business-Service,
Residing at A-202 Shubh Nirman CHS,
Plot 01, Sector 03, New Panvel 410206

**Versus**

Nil .......... **Opponent**

It is hereby informed to the public at large that Late Debasri Subrata Pramanik (Deceased) who died on 14/10/2022 at New Panvel and who is the wife of applicant no.1 and mother of applicant no. 2 & 3. That she and applicant no I were the owner of the following property

**Schedule of the Property**

Apartment No 12 Suvidha CHS Ltd Plot 14 Sector 5 New Panvel Taluka Panvel District Raigad 410206, admeasuring area of 1200 Sq Feet, Valuation of the property total consideration of Rs.19,93,766/- (Rupees Ninteen Lac Ninty Three Thousand Seven Hundred Sixty Six Only) is bounded as below:-

**On or Towards the East :** Plot No.15 & 16.
**On or Towards the West :** Proposed 11 mtr wide road
**On or Towards the South :** Road
**On or Towards the North :** Plot No.13

And the Family Tree of deceased Late Debasri Subrata Pramanik is as below :-

Late Debasri Subrata Pramanik (Deceased)
Shri Subrata Ananta Pramanik (Husband)
Shri Swastik Subrata Pramanik (Son) Smt Shreshtha Pratik Mukherjee (Daughter)

1. That, Late Debasri Subrata Pramanik and Shri Subrata Ananta Pramanik had purchased the aforesaid society plot and got it developed and then the said flat got registered from CIDCO vide the Agreement to lease for flat bearing 12 Suvidha CHS Ltd Plot 14 Sector 5 New Panvel Taluka Panvel District Raigad 410206 between CIDCO Ltd and Suvidha CHS Ltd on 28/03/2002 vide registration no. उरण 1997/2002 for the total consideration of Rs. 19,93,766/- (Rupees Ninteen Lac Ninty Three Thousand Seven Hundred Sixty Six Only)

2. That, the applicants states that after the death of deceseased they approached to the CIDCO office along with the death certificate of the deceseased but officers of the CIDCO stated that if the owner of the flat is death then applicants have to submit the heirship certificate from the Hon'ble Court, Therefore the applicants has to approach this Hon'ble Court to declare themselves as Legal Heirs of deceased Late Debasri Subrata Pramanik who died on 14/10/2022.

That, consequent on the death of deceased applicant being the sole legal heirs and/or the legal representative of the deceseased as per the Hindu Sucessation Act 1956 as filed application u/s 2 of the Bombay Regulation Act No. VIII of 1927 for being declared as the legal heirs of the deceseased in respect of the above said property.

Anbody having any claim, objection against, in to or upon the above said property or the applicants being declared as the legal heirs of the deceased in respect of the above said property shall notify the same in writing within 30 days from the date hereof along with the supporting documentary evidence to the Hon'ble Court. Failing which, the heirship certificate will be issued in accordance with law.

Date: 29/6/24
Place: Panvel

Court Seal

By order
Sd/-
Superintendent, Civil Judge (SD)
Panvel


# सीवूड्सची नवीन सीबीएसई शाळा सुरू करण्याची मागणी

**नवी मुंबई :** महापालिकेमार्फत सीवूड्स सेक्टर ३० येथे सीबीएसई शाळेचे १५ मार्च रोजी ऑनलाईन उद्घाटन झाले, मात्र अद्यापही या शाळाचा वापर सुरू करण्यात आले नसल्याचे समजते. ही शाळा तातडीने सुरू करावी, अशी मागणी भाजपचे रणजित नाईक यांनी आयुक्तांकडे केली.

सध्या सीवूड सेक्टर ५० या ठिकाणची नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक ९३ सीबीएसई या शाळेमध्ये प्रवेश प्रक्रिया पार पडत आहे. या ठिकाणी दारावे गावातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे दारावे गावातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असून, त्यामुळे जवळच असलेल्या सेक्टर ३० येथील सीबीएसई शाळा तत्काळ सुरू करू देण्यात यावी. या संबंधी नाईक यांनी मनपा आयुक्तांना पत्र देत व शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेत चर्चा केली असता त्यांनी लवकरात लवकर शिक्षक भरती करून सीबीएसई शाळा सुरू करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले असल्याचे नाईक यांनी सांगितले.

# 'रोहिणी बोटे यांना मुख्यमंत्री अर्थसहाय्य निधी द्यावा'

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बेलापूर रेल्वे स्थानकात रेल्वेखाली पडल्याने पाय गमावलेल्या रोहिणी बोटे यांना मुख्यमंत्री अर्थसहाय्य निधीतून पाच लाख रुपये देण्यात यावे, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी विधीमंडळात केली आहे.

नोकरीनिमित्त सोमवार सकाळी ८ जुलै रोजी बेलापूर रेल्वे स्थानकात रोहिणी राजेश बोटे ही महिला रेल्वे दुर्घटनेत गंभीर जखमी झाली. पनवेल येथून ठाणे येथे जाणारी १०.३० वाजताची लोकल फलाटावर येत असतांना रोहिणी बोटे हिला अचानक चक्कर आल्याने त्या रेल्वे रुळावर पडल्या. याच वेळी त्या ठाणे लोकलच्या खाली सापडून गंभीर जखमी होऊन त्यांचे दोन्ही पाय कापले गेले. त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट उद्भवले असून रोहिणी बोटे या घरात एकट्या कमावत्या असल्याने त्यांच्या परिवाराचे उदरनिर्वाह कोण करणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. याची दखल घेत बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी विधिमंडळाचे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात पॉंईट ऑफ इनफॉरमेशनद्वारे जखमी झालेल्या रोहिणी हिला मुख्यमंत्री अर्थसहाय्य निधीमधून आर्थिक मदत म्हणून पाच लाख रुपये जाहीर करण्यात यावे, अशी मागणी केली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही पत्राद्वारे कळविले आहे.

आमदार मंदा म्हात्रे यांनी या घटनेबाबत विधिमंडळात आर्थिक मदतीचा प्रश्न उपस्थित केल्याचे रोहिणी यांचे पती राजेश बोटे यांना समजताच त्यांनी त्वरित दूरध्वनीद्वारे संपर्क करून आमदार मंदा म्हात्रे यांचे आभार मानले. गंभीर जखमी रोहिणी बोटे यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत कशी करता येईल याबाबत आपण प्रयत्न करणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी पती बोटे यांना सांगितले. या घटनेतील जखमी महिला रोहिणी बोटे यांच्यावर सीबीडी बेलापूर येथील एम.जी.एम. हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत.

# जुईनगरमध्ये डबक्यात पडून एकाचा मृत्यू

**नवी मुंबई :** जुईनगर सेक्टर २४ येथील मंगलप्रभू रुग्णालयाच्या मागे असलेल्या पाण्याच्या डबक्यात एकाचा पडून मृत्यू झाला. मंगळवारी दुपारी ही घटना घडली. भाजपचे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते विजय साळे यांनी धाव घेतली. स्थानिक नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाला बोलावले. राज सनगरे वय (वय २८) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मंगलप्रभू रुग्णालयाच्या मागे हा खड्डा आहे. विकासकाने जा खड्डा खोदून ठेवला आहे. सध्या सुरू असलेल्या पावसात या खड्ड्यात पाणी साठले आहे. या खड्ड्यात पडून राज सनगरे याचा मृतदेह आढळला. येथील नागरिकांनी अग्निशमन दलाला कळवले. तसेच ही घटना कळवल्यावर त्यांनी तातडीने सामाजिक कार्यकर्ते साळे यांनीदेखील तेथे धाव घेतली. अग्निशमन दलाने मृतदेह बाहेर काढला. तरुणाने मद्यपान केल्याचे निष्पन्न झाले आहे. दारूच्या नशेत पडल्याचे प्राथमिक निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. हा खड्डा बुजवावा, अशी मागणी वारंवार पालिकेकडे केल्याचे विजय साळे यांनी सांगितले. विकासकावर सदोष मनुष्यवधाच्या गुन्हा नोंदवावा, अशी मागणी साळे यांनी केली.

# भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक

**नवी मुंबई :** विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक शुक्रवारी (दि.१९) दुपारी १२ वाजता विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे, असे परिपत्रकाद्वारे उपायुक्त (महसूल) तथा सदस्य सचिव, विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती, कोकणभवन विवेक गायकवाड यांनी कळविले आहे.


MAHAVITARAN

**TENDER NOTICE**
**Invitation for bids on E-Tendering basis**

Tenders in e-tendering format are invited vide Tender No: SE/PC/TECH/T-04/T-05/T-06/T-07/2024-25. Brief scope of work for Contract is as below:

T-04/T-05/T-06/T-07/2024-25 (Tender Cost:- Rs.13.12 Lakh/ Per Tender): Tender for contract for hiring of vehicle for Pen Testing Division Executive Engineer; Batch A, Batch B & Batch C respectively under Pen circle.

- Tender fee Rs.1000/- and GST per tender will be applicable.
- Tender Sale Start Date: 10/07/2024
- Last Date & time (Hours) for submission of bid: 19/07/2024 up to 11:00 Hrs online.

**For details visit website** http://etender.mahadiscom.in/eTender/eatApp

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN**


# माणगावमधील एसटी आगाराची बिकट अवस्था

## डागडुजीसह इमारत बांधकामाला मंजुरी मिळवण्याची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

कोकणात जाणाऱ्या एसटी गाड्यांसाठी माणगाव हे मध्यवर्ती ठिकाण आहे, मात्र या बसस्थानकाची अवस्था बिकट झाली आहे. माणगाव आगाराचे आणि खासदार सुनील तटकरे यांचे अतूट नाते आहे. या आगारासाठी पत्रकारांनी उपोषण करण्याचे जाहीर केल्यावर त्याला अनेकांनी पाठिंबा दिला. कै. माजी आमदार अशोक साबळे स्वत: त्यामध्ये सहभागी झाले. तत्कालीन मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख यांचे मंजुरीचे पत्र मध्यरात्री तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे घेऊन उपोषणस्थळी आले. त्यानंतर अनेक राजकीय बदल झाले, पण त्याचा कोणाताही परिणाम होऊ न देता माणगाव आगार बीओटीवर पूर्ण करण्यात आले. त्यानंतरच्या काळात तत्कालीन एसटी महामंडळाचे अध्यक्ष सुधाकर परिचारक यांचे हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.

आज या बसस्थानकात दररोज हजारपेक्षा जास्त गाड्या येतात, पण स्थानकात जाताना प्रवाशांना आणि गाड्यांनाही खड्ड्यातून जावे लागते. त्यामुळे प्रवाशांचे कपडे खराब होतात. स्थानिक पातळीवर याबाबत व्यवस्थित पाठपुरावा होत नाही, तर याकडे महामंडळाचे अधिकारीही लक्ष देत नाहीत. खासदार सुनील तटकरे यांच्या कन्या आदिती तटकरे आता राज्याच्या मंत्री आहेत. पालकमंत्री उदय सामंत यांनी नुकतेच पनवेल आगाराच्या संबंधी झालेल्या बैठकीत राज्यातील आगारांच्या कामासाठी ६०० कोटी रुपये शासनाने मंजूर केल्याचे सांगितले आहे.

यामधून काही रक्कम मंत्री आदिती तटकरे यांनी माणगाव आगारासाठी मंजूर करून घ्यावी आणि या आगारातील खड्डे तातडीने भरून घेऊन लवकरच बसस्थानकाच्या इमारतीच्या कामालाही मंजुरी मिळवावी, अशी अपेक्षा माणगावकर व्यक्त करीत आहेत.


महाराष्ट्र शासन
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक २ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बा.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ओंबळी येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपुर, जि. रायगड | ३६२३९४७५.०० | १५००००.०० | २३६०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| २ | माटवण जुवळे मोहल्ला सवाद माटवण येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपुर, जि. रायगड | ३९०२४०२४.०० | १३२०००.०० | २३६०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ३ | दाभिळ येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपुर, जि. रायगड | २१८५४४८९.०० | १५००००.०० | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ४ | दाभिळ हळदुले बौध्दविहार येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपुर, जि.रायगड | २१८५४४८९.०० | १५००००.०० | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ५ | पेडेवाडी किनेश्वर गावठाण येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता, पोलादपुर, जि. रायगड | १९१५७८९३.०० | १५००००.०० | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ६ | किनेश्वर (शिववाडी पेडेवाडी व किनेश्वर ) येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपुर, जि. रायगड | १५९५८९०१.०० | १५००००.०० | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ७ | कुडपण बु. येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपुर, जि. रायगड | ११९८५११२.०० | १२००००.०० | ११८०/- | १२ महिने | वर्ग ४ |
| ८ | मोरसडे अडाचाकोंड येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे, ता. पोलादपुर, जि. रायगड | ११९७७८५१.०० | १२००००.०० | ११८०/- | १२ महिने | वर्ग ४ |
| ९ | नानेघोळ गावठाण कदमवाडी बाबरवाडी येथे बहुउद्देशिय निवारा केंद्र बांधणे. ता. पोलादपुर, जि. रायगड | ११९२६०६८.०० | १२००००.०० | ११८०/- | १२ महिने | वर्ग ४ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **११/०७/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१८/०७/२०२४ वेळ १८.००** वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग कोकण मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १२/०७/२०२४ **वेळ १२.०० वाजता** अ.क्र. १ व २ करिता<br>मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १२/०७/२०२४ **वेळ ०३.०० वाजता** अ.क्र. ३ ते ६ करिता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२२/०७/२०२४** वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३२०५**
**दिनांक : ०९/०७/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

पान ५ वरुन...

| अ.क्र. | गावाचे नाव | गट नंबर/सर्व्हे नंबर | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ४१ | चौल | ३३० | ०.१८.५८ |
| ४२ | चौल | ३३१ | ०.०८.५४ |
| ४३ | चौल | ३३२ | ०.०६.३४ |
| ४४ | चौल | २६० | ०.२६.१३ |
| ४५ | चौल | २४४ | ०.०६.८६ |
| ४६ | चौल | २४३ | ०.००.६२ |
| ४७ | चौल | २५४ | ०.०१.५० |
| ४८ | चौल | २४५ | ०.२४.०३ |
| ४९ | चौल | २४१ | ०.००.३० |
| ५० | चौल | २४० | ०.११.०५ |
| ५१ | चौल | २४६ | ०.३१.०३ |
| ५२ | चौल | १८४ | ०.०८.३८ |
| ५३ | चौल | १८३ | ०.००.१७ |
| ५४ | चौल | १८१ | ०.०१.९७ |
| ५५ | चौल | १५३ | ०.१५.९४ |
| ५६ | चौल | १४९ | ०.२१.६८ |
| ५७ | चौल | १५० | ०.०७.४४ |
| ५८ | चौल | १९७ | ०.०२.६२ |
| ५९ | चौल | ४३१ | ०.२७.२१ |
| ६० | चौल | २७३८ | ०.०२.५१ |
| ६१ | चौल | १४८ | ०.२६.४५ |
| ६२ | चौल | ३५० | ०.११.६८ |
| ६३ | चौल | ३३८ | ०.०३.५४ |
| ६४ | चौल | ३३९ | ०.१३.४७ |
| ६५ | चौल | ३३५ | ०.२७.७० |
| ६६ | चौल | १९५ | ०.१४.६९ |
| ६७ | चौल | १८९ | ०.०४.२८ |
| ६८ | चौल | १८८ | ०.१५.६६ |
| ६९ | चौल | १८२ | ०.२२.३५ |
| ७० | चौल | १९६ | ०.३४.९३ |
| ७१ | चौल | १५१ | ०.११.१४ |
| ७२ | चौल | १४६ | ०.१२.४० |
| ७३ | चौल | २७४४ | ०.०४.०६ |
| ७४ | चौल | २७३९ | ०.०८.२० |
| ७५ | चौल | २६९० | ०.३१.८७ |
| ७६ | चौल | २७३६ | ०.१५.८० |
| ७७ | चौल | २७३५ | ०.१४.२७ |
| ७८ | चौल | २७२६ | ०.२०.०८ |
| ७९ | चौल | २७३२ | ०.१०.६० |
| ८० | चौल | २७३० | ०.०८.६८ |
| ८१ | चौल | २७२५ | ०.३६.२८ |
| ८२ | चौल | २७२७ | ०.०५.७१ |
| ८३ | चौल | २७२० | ०.४९.५६ |
| ८४ | चौल | २७२२ | ०.००.६४ |
| ८५ | चौल | २७१९ | ०.०२.११ |
| ८६ | चौल | २७१५ | ०.१३.११ |
| ८७ | चौल | २७१६ | ०.०८.५६ |
| ८८ | चौल | २७१८ | ०.०८.६० |
| ८९ | चौल | २७३१ | ०.०८.५६ |
| ९० | चौल | १५२ | ०.१४.८४ |
| ९१ | चौल | १८७ | ०.१६.५४ |
| ९२ | चौल | २७२४ | ०.०२.९८ |
| ९३ | चौल | २७१७ | ०.३४.१६ |
| ९४ | आगरकोट | रस्ता लागु गट नं. २७१७, १२ | ०.००.७५ |

***अनुसुची***

*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

***तालुका : मुरुड*** — ***जिल्हा : रायगड***

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | कोर्लई | ३५ | ०.१६.०१ |
| २ | कोर्लई | ३४ | १.२६.९८ |
| ३ | कोर्लई | ३६ | ०.२२.४५ |
| ४ | कोर्लई | ३२ | ०.०६.०२ |
| ५ | कोर्लई | ३३ | ०.०१.५२ |
| ६ | कोर्लई | ३१ | ०.०५.९२ |
| ७ | कोर्लई | ३० | ०.०२.६६ |
| ८ | कोर्लई | २९ | ०.००.८८ |
| ९ | कोर्लई | २७ | ०.०८.५६ |
| १० | कोर्लई | २२ | ०.२०.५४ |
| ११ | कोर्लई | १९ | ०.०६.३० |
| १२ | कोर्लई | २० | ०.१३.६० |
| १३ | कोर्लई | १८ | ०.०१.७५ |
| १४ | कोर्लई | १७ | ०.१६.७८ |
| १५ | कोर्लई | १२ | ०.२४.६४ |
| १६ | कोर्लई | ४४ | ०.०६.३० |
| १७ | कोर्लई | ७७ | ०.१३.१२ |
| १८ | कोर्लई | ७६ | ०.०९.०८ |
| १९ | कोर्लई | ५२ | ०.०१.३२ |
| २० | कोर्लई | १ | ०.४३.५२ |
| २१ | कोर्लई | २ | ०.१३.८० |
| २२ | कोर्लई | गावठाण | ०.०३.५६ |
| २३ | कोर्लई | ९ | ०.०५.६८ |
| २४ | कोर्लई | १० | ०.१२.६९ |
| २५ | कोर्लई | २१ | ०.०३.७३ |
| २६ | कोर्लई | ११ | ०.०२.३० |
| २७ | कोर्लई | ५८ | ०.११.१६ |
| २८ | कोर्लई | रस्ता लगत गट नं.२०, ३० | ४.७१.७३ |

***अनुसुची***

*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

**तालुका : मुरुड** — **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | उसडी | ३१३ | ०.०७ |
| २ | उसडी | १४९ | ०.१७५ |
| ३ | उसडी | ३३६ | ०.२०१ |
| ४ | उसडी | ३३५ | ०.०९३ |
| ५ | उसडी | ३३७ | ०.०३६ |
| ६ | उसडी | ३३४ | ०.१८६ |
| ७ | उसडी | ३३८ | ०.१२ |
| ८ | उसडी | ३३९ | ०.०४२ |
| ९ | उसडी | ३४० | ०.००४ |
| १० | उसडी | ३६७ | ०.१४६ |
| ११ | उसडी | ३६८ | ०.०६७ |
| १२ | उसडी | ३६९ | ०.०३८ |
| १३ | उसडी | ३७० | ०.१०८ |
| १४ | उसडी | ३४७ | ०.००४ |
| १५ | उसडी | ३४६ | ०.००५ |
| १६ | उसडी | रस्ता लागु गट नं.३४६, ३८७ | ०.०२१ |
| १७ | उसडी | ३८७ | ०.०१५ |
| १८ | उसडी | ३७५ | ०.०५८ |
| १९ | उसडी | ३०६ | ०.००४ |
| २० | उसडी | ३८६ | ०.१२३ |
| २१ | उसडी | ३८४ | ०.११४ |
| २२ | उसडी | ३८३ | ०.०४ |
| २३ | उसडी | ३८२ | ०.१०६ |
| २४ | उसडी | ३८१ | ०.०२ |
| २५ | उसडी | २५९ | ०.००६ |
| २६ | उसडी | ३८० | ०.००४ |
| २७ | टोकेखार | ४ | १.१९.१९ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सचिन चिवटे)
शासनाचे उप सचिव.

जिमाका/रायगड/जाहिरात/१४/७३८/२०२४

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल जि. रायगड, पिन नं ४१०२०६**

**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान**

## ''जाहीर आवाहन''

पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती घटित करणेकरीता इतर मंडळ / संघ प्रतिनिधींची निवड करणेबाबत इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत.

या जाहीर आवाहनाद्वारे पनवेल महानगरपालिका हडोतोल नागरिकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम ३६ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राजपत्र असाधारण भाग ४–अ, दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी पथविक्रेत्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीकरिताचे नियम व आदेश शासन राजपत्राद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम ११ (भाग–२–ख) अन्वये पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशनासाठी विविध मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागवून प्रतिनिधीची निवड करणेकरिता प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केले आहे.

सदर आदेशान्वये (१) निवासी कल्याण संघ (२ सदस्य), (२) व्यापारी संघ (१ सदस्य), यांचेकडील प्रतिनिधीची निवड करण्यात येईल. सदर संघाकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागवून शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम १२ अन्वये खालील नमूद केलेल्या किमान अर्हता निकषाच्या आधारावर सदर संघाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्याचे नामनिर्देशन करण्यात येईल,

१. संघटनेची किंवा संघाची क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२. संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करीन,
३. संघटनेस किवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.
५. संघटना किवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

जाहीर आवाहन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत (दि.२५/०७/२०२४ अखेरपर्यंत) कार्यालयीन वेळी व दिवशी नमुद संघाकडील इच्छुक व्यक्तीनी नामनिर्देशन अर्ज आवक–जावक विभागास सादर करावेत, तद्नंतर पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती सदस्य नेमणूकीकरीता संघातील इच्छुक व्यक्तीकडून अर्ज केलेल्या अंतिम उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. सदर अंतिम यादी झाल्यानंतर महानगरपालिकेकडून शासनाच्या आदेशानुसार नगर पथविक्रेता समिती गठीत करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. तरी, इच्छुक व्यक्तीनी विहित वेळेमध्ये आपले अर्ज सादर करावेत. असे आवाहन पनवेल महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

टिप: नामनिर्देशन पत्र हे महानगरपालिकेच्या डे–एन.यू.एल.एम. विभागाकडून प्राप्त करुन घेणेचे आहेत.

**सही/–**
**(बाबासाहेब राजळे)**
**उप आयुक्त तथा, शहर प्रकल्प अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.३००/३०१/२०२४**
**दिनांक :– १०/०७/२०२४**

# कर्णधारपदाच्या शर्यतीत हार्दिक पंड्यासह केएल राहुलचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा युवा क्रिकेट संघ सध्या झिम्बाब्वे दौऱ्यावर पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळत आहे. यानंतर टीम इंडियाला श्रीलंकेविरूद्ध तीन टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळायची आहे. जुलैच्या अखेरीस टी-२० मालिका होणार आहे. एकदिवसीय मालिका २ ऑगस्टपासून सुरू होईल. पीटीआयच्या वृत्तानुसार, नियमित वनडे कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला विश्रांती दिली जाऊ शकते. त्यामुळे केएल राहुल किंवा हार्दिक पंड्या या फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचे नेतृत्व करू शकतात.




रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोघेही आयपीएलच्या सुरुवातीपासूनच सातत्याने खेळत आहेत. ३७ वर्षीय रोहितने सहा महिने ब्रेक घेतलेला नाही. डिसेंबर आणि जानेवारीमध्ये दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या कसोटी मालिकेपासून तो सतत खेळला आहे. यात अफगाणिस्तानविरुद्ध टी-२०, इंग्लंडविरुद्धची कसोटी मालिका, आयपीएल आणि टी-२०विश्वचषक यांचा समावेश आहे.

किंग कोहलीही सध्या आपल्या कुटुंबासह लंडनमध्ये आहे. श्रीलंकेविरूद्धची मालिका जुलैच्या शेवटच्या आठवड्यात खेळवली जाणार आहे. अशा परिस्थितीत कोहलीही संघाचा भाग नसण्याची दाट शक्यता आहे.

२०२५मध्ये पाकिस्तानमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन केले जाणार आहे. दरम्यान, पीसीबीने या स्पर्धेचे वेळापत्रक आयसीसीकडे पाठवले आहे. यात टीम इंडियाच्या सामन्यांचाही समावेश आहे, पण भारतीय संघ तिथे जाणार की नाही याबाबत सध्या काहीही निश्चित नाही. बोर्डाच्या एका सूत्राने सांगितले की, चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी इंग्लंडविरूद्धचे तीन एकदिवसीय सामने तयारीसाठी पुरेसे आहेत. यानंतर पुढील काही महिने रोहित शर्मा आणि विराट कोहली कसोटीला प्राधान्य देतील कारण भारताला सप्टेंबर ते जानेवारीदरम्यान दहा कसोटी खेळायच्या आहेत.

**कर्णधारपदासाठी दोन मोठे दावेदार :**
रोहित शर्मा श्रीलंका दौऱ्यातून बाहेर पडला तर टीम इंडियामध्ये कर्णधारपदासाठी दोन मोठे दावेदार आहेत. यामध्ये केएल राहुल आणि हार्दिक पंड्या आघाडीवर आहे. या दोघांनी रोहित शर्माच्या अनुपस्थितीत टीम इंडियाचे कर्णधारपद आधीच सांभाळले आहे आणि त्यांना आयपीएलमध्येही कर्णधारपदाचा अनुभव आहे.

# स्पेन १२ वर्षांनंतर युरो कपच्या अंतिम फेरीत दाखल

**बर्लिन : वृत्तसंस्था**



स्पेनने तब्बल १२ वर्षांनंतर युरो कपच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. मंगळवारी जर्मनीच्या बर्लिनमधील अलियान्झ एरिना येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य फेरीत फ्रान्सचा २-१ असा पराभव केला. स्पेनच्या विजयाचे नायक दानी ओल्मो आणि १६ वर्षीय लॅमिने यामल होते.

आता अंतिम फेरीत स्पेनचा सामना रविवारी इंग्लंड आणि नेदरलँड्स यांच्यात होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य लढतीतील विजेत्या संघाशी होईल. याआधी स्पेनने २०१२ मध्ये इटलीला हरवून अंतिम फेरी गाठली होती. स्पेनच्या विजयाचे नायक हे १६ वर्षीय लॅमिने यामल आणि दानी ओल्मो ठरले.



दोघांनी संघासाठी १-१ गोल केला. सामन्याच्या पहिल्या १० मिनिटांत एक गोल करून फ्रान्सने आघाडी घेतली होती, मात्र १५ मिनिटांनंतर स्पेनने पहिला गोल नोंदवून बरोबरी साधली.

सामन्याच्या ७व्या मिनिटाला फ्रान्सचा कर्णधार कायलियन एमबाप्पेने गोल करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो गोलपोस्टपर्यंत पोहोचण्याआधीच येशू नव्हासने त्याच्याकडून बॉल हिसकावून घेतला.

अवघ्या दोन मिनिटांनंतर, एमबाप्पेकडे बॉल होता, त्याने लगेच बॉल आपल्या सहकाऱ्याकडे पास केला आणि कोलो मुआनीने हेडरने बॉल गोलपोस्टमध्ये मारून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

## '...म्हणून आयपीएलदरम्यान हार्दिकवर टीका केली'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्यासाठी मागील काही महिने खूप संघर्षाचे होते. आयपीएल २०२४मध्ये त्याच्या कर्णधारपदाखाली मुंबई इंडियन्सच्या कामगिरीने त्याला क्रिकेट चाहत्यांसह माजी खेळाडूंचे लक्ष्य बनवले होते. माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाणदेखील हार्दिकचा कठोर टीकाकार बनला होता, परंतु टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात हार्दिकने ज्याप्रकारे कामगिरी केली, त्यानंतर अचानक त्याच्यासाठी परिस्थिती बदलली. स्टार स्पोर्ट्स चॅनलशी बोलताना इरफान पठाण म्हणाला की, त्याने हार्दिकवर टीका केली कारण आयपीएल २०२४मध्ये त्याची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. इरफान म्हणाला, हार्दिक पंड्यासाठी हा प्रवास खास होता. त्याने टीकेतून स्वत:ला यशस्वीपणे सावरले आणि पुनरागमन केले.

## राहुल द्रविडने बक्षिसाच्या रकमेतील अडीच कोटी नाकारून चाहत्यांची जिंकली मने

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नुकत्याच आटोपलेल्या आयसीसी टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेमध्ये भारतीय संघाने अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करीत विश्वविजेतेपद पटकावले होते. भारतीय संघाच्या कामगिरीमध्ये मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी मोलाची भूमिका बजावली होती. एक फलंदाज म्हणून भारतीय संघाला अनेक सामन्यात यश मिळवून देणाऱ्या राहुल द्रविड यांनी प्रशिक्षक म्हणूनही आपल्या कौशल्याची छाप पाडली, मात्र प्रदीर्घ क्रिकेट कारकिर्दीत अनेकदा यशापयश पचवणाऱ्या राहुल द्रविड यांचे पाय जमिनीवरच राहिले. त्याचाच प्रत्यय आता भारतीय संघाला टी-२० विश्वचषक स्पर्धेत मिळालेल्या यशानंतर येत आहे. टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाला विजय



मिळाल्यानंतर बीसीसीआयनेभारतीय क्रिकेट संघ आणि प्रशिक्षक वर्गाला मोठ्या रकमेची बक्षीसे जाहीर केली आहेत, मात्र राहुल द्रविड यांनी प्रशिक्षक म्हणून मिळणारा एक्स्ट्रा बोनस घेण्यास नकार दिला आहे.

बीसीसीआयने टी-२० विश्वचषक विजेत्या संघाला १२५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. ही रक्कम खेळाडू आणि कोचिंग स्टाफमधील ४२ सदस्यांमध्ये वाटले जाणार होते. १२५ कोटी रुपयांमधून संघातील सर्व १५ सदस्य आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांना प्रत्येकी पाच कोटी मिळतील, तर कोचिंग स्टाफमधील इतर सदस्यांना प्रत्येकी २.५ कोटी मिळणार आहेत. टी-२० विश्वचषकामध्ये राहुल द्रविड यांच्यासोबत सपोर्ट स्टाफमध्ये विक्रम राठोड, पारस म्हाम्ब्रे आणि टी. दिलीप यांचा समावेश होता.

राहुल द्रविड यांनी विश्वविजयासाठी मिळणारा एक्स्ट्रा बोनस घेण्यास नकार दिला आहे. आपल्याला इतर कोचिंग स्टाफला मिळणाऱ्या रकमेएवढीच रक्कम द्यावी अशी मागणी राहुल द्रविड यांनी केली आहे. याचाच अर्थ राहुल द्रविड त्यांना मिळणाऱ्या पाच कोटी बक्षीसाच्या रकमेपैकी २.५ कोटींवर पाणी सोडण्यास तयार आहेत. ते २.५ कोटी रुपयेच घेतील.

## २६ तारखेपासून ऑलिम्पिकचा थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या २६ जुलैपासून पॅरिस ऑलिम्पिकला सुरुवात होत आहे. ११ ऑगस्ट २०२४पर्यंत या बहुचर्चित स्पर्धेचा थरार रंगेल. या स्पर्धेत भारताचे प्रमुख पाच खेळाडू वैयक्तिक पदक जिंकतील, अशी आशा आहे.

भालाफेकपटू नीरज चोप्राने मागील ऑलिम्पिकमध्ये अर्थात टोकियो ऑलिम्पिकमध्ये ८५.९७ मीटर भाला फेकून सुवर्ण पदक जिंकले होते. भारतासाठी सुवर्ण जिंकणारा तो एकमेव खेळाडू होता. त्यामुळे यावेळीही नीरज सोनेरी कामगिरी करेल, अशी आशा आहे, तसेच देशातील नामांकित महिला पैलवान विनेश फोगट शानदार फॉर्ममध्ये आहे. अलिकडेच स्पेनमध्ये तिने सुवर्ण पदकाला गवसणी घातली. आता विनेश २० दिवसांसाठी फ्रान्सला गेली आहे. जिथे ती ऑलिम्पिकची तयारी करीत आहे. तिच्याकडून भारतीयांना पदकाची आशा असेल यात शंका नाही. स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूच्या खांद्यावर मोठी जबाबदारी आहे. सिंधूने यापूर्वी दोनवेळा ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकण्याची किमया साधली आहे. त्यामुळे तिने पॅरिसमध्येही पदक जिंकल्यास ती पदकांची हॅट्ट्रिक मारणारी पहिली भारतीय ठरेल.

टोकियो ऑलिम्पिकमध्ये चांगली कामगिरी करून रौप्यपदक जिंकणाऱ्या मिराबाई चानूवर सर्वांच्या नजरा असतील. तिने २००-२१० वजन उचलण्यात यश मिळवले तर भारताला पदक मिळेल हे निश्चित. ती एनआयएस पटियाला येथे प्रशिक्षण घेत आहे. तिच्याशिवाय दोन वेळा वर्ल्ड चॅम्पियन असलेल्या निखत जरीनकडून तमाम भारतीयांना पदकाची आशा असेल. निखत आणि इतर पाच बॉक्सर जर्मनीच्या सारब्रुकेन येथील ऑलिम्पिक सेंटरमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.









**पनवेल : स्वानंद सुख निवासी चांगू काना ठाकूर यांचा पुण्यतिथी सोहळा शिवजीनगर येथील बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरामध्ये आयोजित करण्यात आला होता. या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त मंगळवार पुरुषोत्तम महाराज धाटाव आणि मंडळी यांचे कीर्तन झाले. या वेळी पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्या रत्नप्रभा घरत, रमन ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, पद्माकर ठाकूर आदी उपस्थित होते, तसेच गुरुकृपा महिला भजन मंडळ व भावभक्ती महिला भजन मंडळ खारकोपर यांचे भजन, संत जनाबाई भजन मंडळ आणि मंडळी यांचेही भजन झाले. विहीघर, शिवाजीनगर शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षकांनी या सोहळ्याला सदिच्छा भेट भेट दिली. या वेळी सोबत राधाताई ठाकुर, भागिरथी मोकल आदी उपस्थित होते.**

## महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने पुणे येथील शिव छत्रपती क्रीडा संकुल येथे होणाऱ्या २४व्या कबड्डी दिनाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले.



जळगावच्या मोहन भावसार व पुण्याच्या वासंती सातव-बोर्डे यांना कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव साळवी कबड्डी जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. एशियन कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघातील महाराष्ट्राच्या स्नेहल साखरे (शिंदे), असलम इनामदार, आकाश शिंदे यांचा देखील खास सन्मान होणार आहे. सदानंद माजलकर (मुंबई उपनगर), मधुकर पाटील (मुंबई शहर), बाळकृष्ण उबाळे (ठाणे) यांना स्व. रमेश देवाडीकर स्मृती श्रमयोगी कार्यकर्ता पुरस्कार, रत्नागिरीच्या रविंद्र देसाईला कृतज्ञता, तर अहमदनगरचा आदित्य शिंदे व पुण्याच्या आम्रपाली गलांडे यांना अनुक्रमे स्व.मधुसूदन पाटील व स्व. अरुणा साटम पुरस्कार देण्यात येणार आहे. पुण्याच्या भास्कर जोशी यांना ज्येष्ठ पत्रकार, तर स्व. फिदा कुरेशी ज्येष्ठ प्रशिक्षक पुरस्कार बजरंग परदेशी (नंदुरबार), प्रभाकर कदम (पुणे), सतीश गायकवाड (ठाणे), रमेश खवाटे (सांगली), शरद महाडिक (रत्नागिरी) यांना घोषित करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे स्व. बाबाजी जामसांडेकर, स्व. मुकुंद जाधव व कबड्डी महर्षी स्व. शंकरराव साळवी यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती रविंद्र माने, प्रदीप जाधव, सूरज राठोड, बिदिशा सोनार, मोनिका पवार, समीक्षा पाटील, वैभव रबाडे, साहिल पाटील, जयेश महाजन, वैभवी जाधव, समृद्धी मोहिते, जुवेरिया पिंजारी यांना देण्यात येणार आहे.

ज्येष्ठ खेळाडू म्हणून सुनील डकरे, भारत संधाने, सतीश लोभे, अनंता शेलार, संजय फडके, हिरामण समजिसकर, स्मिता देवस्थळी, अरुणा जाधव यांना, तर नंदकुमार काळोखे, निवृत्ती आजगेकर, रविंद्र म्हात्रे, विलास गुजर, सुरेश शेडगे, नरेंद्र लाड, सायराबानु शेख, जयंत मोरे, सूर्यकांत देसाई यांना ज्येष्ठ पंच पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.

## आर. अश्विनने विकत घेतला अमेरिकन गॅम्बिट्स संघ

**मुंबई : प्रतिनिधी**

रवीचंद्रन अश्विनची गणना जगातील स्टार फिरकीपटूंमध्ये केली जाते. क्रिकेटबरोबरच अश्विन आता बुद्धिबळाच्या पटावरही आला आहे. अश्विन ग्लोबल चेस लीगमधील अमेरिकन गॅम्बिट्स संघाचा सहमालक बनल्याची बातमी समोर आली आहे.

ग्लोबल चेस लीगचे दुसरे वर्ष २०२४मध्ये खेळवले जाणार आहे. दरम्यान या लीगमधील एक संघ रवीचंद्रन अश्विनने विकत घेतला आहे. ग्लोबल चेस लीगच्या दुसऱ्या सत्रात सहभागी होणारा सर्वात नवीन संघ अमेरिकन गॅम्बिट्स असणार आहे. लीगचा दुसरा हंगाम ३ ते १२ ऑक्टोबरदरम्यान लंडनमध्ये खेळवला जाणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com